अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३७ । शनिवार २८ फेब्रुवारी २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## मंत्री पंकजा मुंडे यांच्या तक्रारीनंतर आयएएस अधिकाऱ्याचे निलंबन



मुंबई : पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी बोलावलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीला हजर न राहिल्याने तसेच विधानसभेतील चर्चेदरम्यान पंकजा मुंडेंच्या आदेशानंतरही आयएएस अधिकारी एम. देवेंद्र सिंग हे ब्रीफिंगसाठी न आल्याने अखेर त्यांना निलंबित करण्यात आले. याप्रकरणी, तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी निलंबनाचे आदेश दिले. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. एम. देवेंद्र सिंग हे २०११ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आहेत. त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित होती. त्यानुसार, त्यांचे निलंबन करण्यात आल्याचे संबंधित आदेशात म्हटले आहे. अतिरिक्त सचिव व्ही. राधा यांच्या सहीने ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, काल पंकजा मुंडे यांनी सांगितले की, एक आयएएस ऑफिसर ब्रीफिंगसाठी येणार नाही असं म्हणतो. एक अधिकारी मंत्री महोदयांबद्दल असं बोलतो, त्याला निलंबित करण्याचे आदेश कालच अध्यक्ष्यांनी दिले होते. त्यानुसार, २४ तासात ती कार्यवाही झाली पाहजे, ही घटना कालची आणि आज निलंबन झाले, असे सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

### महत्त्वाचे..

## 'तोतला' वाद पेटला!

### किरीट सोमय्यांकडून इम्तियाज जलील यांना १० कोटींची नोटीस



**संभाजीनगर :** भाजप नेते किरिट सोमय्या यांनी महाराष्ट्रातील 'एमआयएम' पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांना 'तोतला' म्हटल्याचा आरोप करत १० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची नोटीस पाठवली आहे. ही माहिती जलील यांनी त्यांच्या सोशल मीडियाच्या अकाउंटवरून दिली आहे. या पोस्टनुसार, दोन राष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये माफी मागावी आणि प्रतिष्ठेला हानी पोहोचल्याबद्दल १० कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी सोमय्या यांच्याकडून करण्यात आली आहे. याबद्दलची नोटीस जलील यांना सोमय्या यांच्या वकिलाकडून पाठवण्यात आली आहे. पण यावर सोमय्या यांनी या नोटीसबाबत दुजोरा दिला नाही. भाजप नेते किरिट सोमय्या यांनी माझ्यावर आरोप केला आहे की मी त्यांना 'तोतला, तोतले, तोतल्या असे म्हटले आहे. तसेच त्यांनी माझ्यावर आरोप केला आहे की मी त्यांचा कथित व्हिडिओ मुंब्राच्या मुख्य चौकात प्रक्षेपण करण्याची धमकी दिली होती,

# दिल्ली मद्य धोरण घोटाळा

## केजरीवाल, सिसोदियांसह २१ निर्दोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या अत्यंत वादग्रस्त दारू धोरणाशी संबंधित प्रकरणात राऊस अव्हेन्यू न्यायालयाने दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांना सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्त केले आहे. दोघांसह इतर २१ आरोपींना न्यायालयाकडून क्लीन चिट मिळाली. यावेळी न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की केवळ दावे पुरेसे नाहीत. न्यायालय केवळ ठोस आणि ठोस पुराव्यांद्वारे समर्थित आरोपावर अवलंबून राहू शकते. तपास यंत्रणेने सादर केलेले पुरावे कमकुवत आणि अपुरे असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायालयाने प्रथम उत्पादन शुल्क विभागाचे माजी आयुक्त कुलदीप सिंग यांना निर्दोष मुक्त केले. त्यानंतर, मनीष सिसोदिया यांना दिलासा मिळाला आणि त्यानंतर अरविंद केजरीवाल यांच्यासह २१ जणांना निर्दोष मुक्त करण्यात आले.

न्यायालयाच्या निकालानंतर पहिल्यांदाच प्रतिक्रिया देताना म्हणाले, आम्ही नेहमी सांगायचो सत्याचा विजय होतो. आम्हाला भारतीय न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. ज्या न्यायमूर्तींनी आमच्यासोबत न्याय केला त्यांचे धन्यवाद... सत्याचा विजय झाला, मी नेहमी सांगायचो भगवान आमच्यासोबत आहे. मोदीजी आणि अमित शाह यांनी स्वतंत्र भारतातील सर्वात राजकीय षडयंत्र रचलं. आम आदमी पार्टीला संपवण्यासाठी पक्षाच्या सर्वात मोठ्या पाच नेत्यांना तुरुंगात टाकलं. विद्यमान मुख्यमंत्र्याला घरातून फरफटत नेऊन तुरुंगात टाकलं, सहा महिने आत ठेवलं गेलं.जे भारताच्या इतिहासात कधी घडलं नाही. केजरीवाल भ्रष्ट नाही.. केजरीवाल भ्रष्ट नाही. मी माझ्या आयुष्यात इमानदारी कमावली. यांनी खोटी केस लावली, ते आज सिद्ध झालं. कोर्टानं म्हटलं केजरीवाल कट्टर इमानदार, मनीष सिसोदिया कट्टर इमानदार आहेत. आम आदमी पार्टी कट्टर इमानदार आहे.

दिल्लीच्या मद्यधोरणाशी संबंधित प्रकरणात न्यायालयाने निर्दोष मुक्तता दिल्यानंतर माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल भावूक झाल्याचे दिसून आले. निकालानंतर बोलताना त्यांनी आपल्या विरोधात पूर्णपणे खोटा गुन्हा तयार करण्यात आल्याचा आरोप केला. राऊस अव्हेन्यू न्यायालयाने केजरीवाल आणि त्यांचे सहकारी मनिष सिसोदिया यांना सर्व आरोपांतून मुक्त केले आहे. ठोस आणि पुरेशा पुराव्यांशिवाय लावलेल्या आरोपांवर विश्वास ठेवता येत नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले.

या प्रकरणात सर्वप्रथम आबकारी विभागाचे माजी आयुक्त कुलदिप सिंग यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. त्यानंतर सिसोदिया आणि शेवटी केजरीवाल यांनाही दिलासा देण्यात आला. सीबीआय ने दाखल केलेल्या आरोपपत्रात अनेक त्रुटी असल्याचे न्यायालयाने नमूद केले. काही महत्त्वाच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात तपास यंत्रणेला अपयश आल्याचे निरीक्षण नोंदवत पुरावे कमकुवत व अपुरे असल्यामुळे दिलासा देण्यात आल्याचे सांगितले. संवैधानिक किंवा सार्वजनिक पदावर असलेल्या व्यक्तींवर गंभीर आरोप करताना ठोस पुरावे असणे अत्यावश्यक आहे; केवळ आरोप पुरेसे नसतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दरम्यान, या निर्णयाबाबत सीबीआयने असमाधान व्यक्त केले असून उच्च न्यायालयात आव्हान देण्याचे संकेत दिले आहेत. आदेशाचा सविस्तर अभ्यास करून अपील दाखल करण्यात येईल, असे सीबीआयच्या वकिलांनी म्हटले आहे.हे प्रकरण २०२२-२३ च्या दिल्ली अबकारी धोरणाशी (पान ४ वर)

### अरविंद केजरीवालांचे मोदींना चॅलेंज



**कोर्टाचा निकाल ऐतिहासिक आहे. हे पूर्ण षडयंत्र नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी रचलं. त्यांनी पूर्ण देशाची माफी मागितली पाहिजे. दोघांनी मिळून षडयंत्र रचलं आणि आम आदमी पार्टीला संपवण्याचा प्रयत्न केला. दिल्लीत ते आम्हाला पराभूत करु शकत नव्हते, हे ते पाहत होते, दिल्लीची जनता आमच्यावर खुश आहे हे ते पाहत होते. जनतेला माहिती आहे केजरीवाल इमानदार आहेत. त्यामुळं त्यांनी केजरीवालच्या इमानदारीवर आघात केला. आज दिल्लीत कुठंही गेलात तर रस्ते खराब आहेत, रुग्णालयात औषधं मिळत नाहीत. मोहल्ला क्लिनिक बंद केलेत, शाळांची स्थिती खराबआहे. प्रदूषण आणि यमुना नदीची स्थिती खराब आहे. दिल्लीतील परिस्थिती खराब झालीय.जर हिम्मत असेल तर दिल्लीत पुन्हा निवडणूक घ्या, १० पेक्षा अधिक जागा भाजपनं जिंकल्या तर राजकारण सोडेन.**

**–अरविंद केजरीवाल**
**माजी मुख्यमंत्री, दिल्ली**

## शिखर बँक घोटाळाप्रकरणी क्लोजर रिपोर्ट स्वीकारला

### सुनेत्रा पवार यांना दिलासा : अजित पवारांसह ७० जणांना क्लीनचीट



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील राज्य सहकारी बँक म्हणजेच शिखर बँकेत हजारो कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप तत्कालीन विरोधी पक्षांकडून करण्यात आला होता. राज्यात भाजपचे सरकार पहिल्यांदा सत्तेत आल्यानंतर अजित पवार यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यावर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, याप्रकरणी क्लोजर रिपोर्ट समोर आला असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, दिवंगत नेते अजित पवार यांच्यासह ७० जणांना क्लीन चीन देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट विशेष न्यायालयाने स्वीकारला.

राज्यात महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर शिखर बँक घोटाळाप्रकरणी पहिला क्लोजर रिपोर्ट दाखल झाला होता. मात्र, शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत येताच पुन्हा तपास करायचा आहे असं मुंबई पोलिसांनी कोर्टात सांगितल होतं. पण, अजित पवार उपमुख्यमंत्री (पान ४ वर)

**२५ हजार कोटींचा घोटाळा?**

**२५,००० कोटींचा कथित शिखर बँक घोटाळ्याप्रकरणी ही मोठी अपडेट आहे. सन २००२ ते २०१७ दरम्यान या साखर कारखान्यांनी कर्जफेड न केल्यामुळे शिखर बँकेला २५,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. कर्ज वसुलीच्या नावाखाली चडउइ ने साखर कारखाने आणि त्यांची जमीन कवडीमोल भावात लिलावात विकली हे बहुतांश व्यवहार बँकेचे प्रमुख असलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनाच करण्यात आले होते. त्यामुळे, तत्कालीन विरोधक असलेल्या भाजपने हा मुद्दा घोटाळा म्हणून उपस्थित केला होता.**

## शिंगणापूरच्या ॲप घोटाळ्याची ईडी, सीबीआयमार्फत चौकशी करा

### संभाजीनगरच्या खंडपीठात याचिका दाखल; ३० मार्च रोजी होणार सुनावणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शनिशिंगणापूर :** श्री शनिशिंगणापूर देवस्थानातील हजारो कोटी रुपयांच्या ऑनलाइन ॲप घोटाळ्याची सक्तवसुली संचालनालय (ईडी) व केंद्रीय गुन्हे अन्वेषण यंत्रणेमार्फत (सीबीआय) चौकशी व्हावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका छत्रपती संभाजीनगर खंडपीठात दाखल झाली आहे. याचिकेवर येत्या ३० मार्च रोजी सुनावणी होणार आहे.

पोलीस यंत्रणा किंवा राज्य सरकारने तपास पूर्ण झाल्याचे जाहीर केले असले तरी खरे दोषी मासे अद्याप सुरक्षित आहेत. केवळ ७७ लाख रुपयांचा घोटाळा दाखवून दोन कर्मचाऱ्यांना दोषी ठरवणे व दोषारोपपत्र दाखल करणे हे फक्त डोळ्यांवर पट्टी बांधण्याचे प्रयत्न असल्याचे ग्रामस्थ व शनिभक्तांचे म्हणणे आहे. विधानसभेत नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे व आ. सुरेश धस यांनी हजारो कोटींचा भ्रष्टाचार उघड केला होता. कर्मचाऱ्यांच्या दोन-दोन कोटी रुपयांच्या बंगल्यांची माहिती ग्रामस्थांकडे आहे. तरीही वरिष्ठ स्तरावरून झालेल्या समझोत्यामुळे प्रकरण दाबण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांनी केला आहे.

सचिन दरंदले यांनी प्रथम मुख्यमंत्री यांना वारंवार निवेदन दिले. दखल न घेतल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाने प्रक्रियेनुसार प्रथम उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले. त्यानुसार दरंदले यांनी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात सार्वजनिक हितार्थ याचिका क्रमांक ७/२६ दाखल केली आहे. ग्रामस्थ व शनिभक्तांमध्ये प्रचंड असंतोष आहे, असा दावा दरंदले यांनी केला आहे.



**खंडपीठात न्याय मिळाला नाही तर पुन्हा सर्वोच्च न्यायालयात जाऊ. सर्व दोषींवर कारवाई व सर्व घोटाळ्यांची चौकशी झाल्याशिवाय शांत बसणार नाही,**

**– सचिन दरंदले, याचिकाकर्ते**

**याचिकेतील मुख्य मागण्या :**

**१. देवस्थानातील संगणकीय अर्ज घोटाळ्याची ईडी व सीबीआयमार्फत चौकशी व्हावी.**

**२. बनावट पावती घोटाळा, क्यूआर स्कॅन घोटाळा, बनावट देणगी घोटाळा, अतिरिक्त कर्मचारी भरती घोटाळा यांचीही चौकशी व्हावी.**

**३. मागील पंधरा वर्षांचे संपूर्ण लेखापरीक्षण केंद्रीय लेखापरीक्षक व माजी न्यायाधीश यांच्या समितीमार्फत करावे.**

## मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर कारवाई : मंत्री दादाजी भुसे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य करण्यात आले असून मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येईल असा ईशारा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिला . मराठी शाळांची पटसंख्या वाढवण्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात शिक्षण विभागाने सुक्ष्म नियोजन केले आहे. येणाऱ्या २०२६-२७ या वर्षात मराठी शाळांमध्ये किमान २५ टक्के पटसंख्या वाढलेली दिसेल, अशी ग्वाही भुसे यांनी विधानसभेत दिली.



आ. विक्रम पाचपुते यांनी मराठी शाळांच्या पटसंख्येचा प्रश्न उपस्थित केला. तसेच आ. अमित देशमुख यांनी इतर माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी सक्तीची आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, सर्व माध्यमांच्या, सर्व भाषिकांच्या आणि सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येईल.

यावर उत्तर देताना मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, २०१२-१३ मध्ये शासकीय शाळांमध्ये ६८ लाख ९७ हजार २९१, अनुदानित खासगी शाळांमध्ये १ कोटी ७ लाख ८८ हजार ७७३ आणि स्वयं अनुदानित शाळांमध्ये ४१ लाख ६५ हजार ७७९ विद्यार्थी संख्या होती. तर एकूण विद्यार्थी संख्या २ कोटी १८ लाख इतकी होती.

तसेच २०२३-२४ मध्ये शासकीय शाळांमध्ये ५२ लाख ३१ हजार विद्यार्थी संख्या आहे. तर, एकूण विद्यार्थी २ कोटी १२ लाख आहेत. यापूर्वी आधार प्रमाणीकरणाची व्यवस्था नव्हती. त्यामुळे तपासणी करण्यात आल्यावर ९ लक्ष विद्यार्थी कमी आढळून आले. ही विद्यार्थ्यांची संख्या अपडेट करण्याची व्यवस्था असून ते वेळोवेळी अपडेट केले जाते. शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी वेगवेगळे प्रावधान करण्यात आले आहेत.

## डॉ. सुजय विखे यांच्याकडून भाजपा अध्यक्ष नबीन यांना निमंत्रण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**शिर्डी :** महाराष्ट्रप्रदेश भारतीय जनता पार्टी कार्यकारिणीने अहिल्यानगर जिल्ह्याचे नेते माजी खासदार सुजय विखे यांची भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लागल्यानंतर काल नवी दिल्ली येथे भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय पक्ष कार्यालयात नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष नितीनजी नबीन यांची डॉ सुजय विखे पाटील यांनी सदिच्छा भेट घेतली.

भारतीय जनता पार्टीच्या ने डॉ . सुजय विखे यांना राज्य पातळीवर कार्य करण्याची संधी दिल्याबद्दल श्री .नबीन यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच अहिल्यानगर येथे उभारण्यात येत असलेल्या पक्ष कार्यालयाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून, आगामी उद्घाटन सोहळ्यासाठी त्यांना आदरपूर्वक निमंत्रण डॉ सुजय विखे पाटील यांनी दिले.

यावेळी भावी संघटनात्मक कार्यासाठी श्री नबीन यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद यावेळी घेतले .

## न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवा; देशासाठी काम करा

### मद्य घोटाळ्यातून निर्दोष सुटका: केजरीवाल यांना अण्णा हजारेंचा सल्ला



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राळेगणसिद्धी :** दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणात आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल व मनीष सिसोदिया यांची ५०० दिवसांनंतर जेलमधून निर्दोष सुटका झाल्यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी न्यायव्यवस्थेचा आदर ठेवण्याचे आवाहन केले. राळेगणसिद्धी येथे पत्रकारांशी बोलताना अण्णा म्हणाले, अटकेवेळी मी जे काही बोललो ते न्यायालयीन निर्णयापूर्वी होते. आता न्यायव्यवस्थेने निर्दोष सुटका केली आहे, तो निर्णय सर्वांनी मान्य करावा. अण्णा पुढे म्हणाले, भारत (पान ४ वर)

**अजित पवार अपघाताची पारदर्शक चौकशी करावी**

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाची चौकशी व्हावी या मागणीवर अण्णा म्हणाले, देश लोकांच्या मतावर चालतो. लोकभावना असेल तर सरकारने पारदर्शक चौकशी करावी. निर्णय घेताना पूर्ण पारदर्शकता बाळगावी.**

## साईंच्या दरबारात ओशाळली माणुसकी..!

### आयुष्यभर इमानदारीने सेवा केलेल्या कर्मचाऱ्याला साई दरबारात झालेला अपमान जिव्हारी लागला

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** साई बाबांच्या पावन दरबारात ४२ वर्षे इमानदारीने सेवा करणाऱ्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याची माणूसकी अपमानाच्या चिरेबंदीत अडकली. संरक्षणाच्या नावाखाली झालेल्या अपमानाने त्यांच्या जिवाला इतका धक्का बसला की, घटनेच्या चौथ्याच दिवशी हार्ट अटॅक येऊन ते गेल्या वर्षापासून अंथरुणावर खिळले आहेत. ही हृदयद्रावक घटना मागील रामनवमी उत्सवात घडली.

### वर्षभर अंथरुणाला खिळल्यानंतरही प्रसंग विसरणे कठीण

शिर्डीत बांगड्या बनवून उपजीविका करणाऱ्या कष्टकरी कुटुंबातील कुंभकर्ण यांनी साई संस्थानमध्ये मदतनीस म्हणून नोकरी सुरू केली. ४२ वर्षांच्या अखंड सेवेत त्यांनी चहा कॅन्टीनचे खाते प्रमुख, प्रभारी अधीक्षक अशी पदे भूषवली. कुठेही डाग न पडू देता इमाने इतबारे काम करत २०२३ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. 'आता बाबा आशीर्वाद देतील' या आशेने दोन वर्षे गेली. मुलाचे लग्न ठरले. साखरपुड्यासाठी रावळे नातेवाईक, बहीण-भाचा आले.

रामनवमीच्या गर्दीत कासार यांनी नातेवाईकांना साई समाधीचे दर्शन घडवण्यासाठी नेले. गेटवर सुरक्षा रक्षकांना विनंती केली, माझ्यासोबत नातेवाईक आहेत, दर्शन घेऊ द्या. तेवढ्यात तेथील पोलीस संरक्षण अधिकारी आले. ६२ वर्षांच्या सेवानिवृत्त इसमाची गचांडी पकडून त्यांना बाहेर ओढले. अर्वाच्य भाषेत शिव्या देत दोन तास जमिनीवर बसवून ठेवले. बहीण-भाचा हात जोडून किंचाळले, साहेब, आम्ही त्यांचे रक्ताचे नातेवाईक आहोत! कासार शांतपणे म्हणाले, साहेब, मी ४२ वर्षे संस्थानची सेवा केली आहे, अपमान करू नका. पण अधिकारी ऐकायला तयार नव्हते. त्यांनी कासार यांचे आधार कार्डही जप्त केले, ते आजही परत दिले नाही. प्रशासकीय अधिकाऱ्यांना खबर दिली. काहींनी तो आमचा कर्मचारी होता, असा अपमान नको अशी विनंती केली. तरीही कोणी पुढे आले नाही.

**आयुष्यभर साईंच्या चरणी घालवलेल्या ठिकाणी नातेवाईकांसमोर झालेला घोर अपमान सहन न झाल्याने कासार तक्रार न करता जड पावलांनी घरी परतले. आज ते अंथरुणावर असतानाही त्या अपमानाचे क्षण डोळ्यांसमोर येतात. साईंच्या दरबारात माणूसकी ओशाळली, असे म्हणत त्यांचा जीव कंठाशी येतो. संरक्षण देणाऱ्यांकडूनच अपमान... ही घटना फक्त एका माणसाची नाही, तर साई भक्तांच्या भावनांची आहे.**

## कोणी सुनेत्रा काकींच्या खांद्यावर हात टाकतो, कोणी ओढतो...

### आ. रोहित पवारांचा राष्ट्रवादीतील 'चौकडी'वर हल्लाबोल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अजितदादा असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर त्यांचा वचक होता. आता त्यांच्या निधनानंतर आपण सुनेत्रा पवार यांना कंट्रोल करु, या भ्रमात राष्ट्रवादी काँग्रेसमधील काहीजण आहेत. पण सुनेत्रा काकी या एक सक्षम महिला आहेत. थोड्या दिवसांनी या नेत्यांना त्यांची ताकद काय आहे ते कळेल. नेता पार्टी कसा चालवतो, हे कळेल. त्यामुळे अजितदादा गटातील चार नेत्यांनी सांभाळून राहावे, असा इशारा आ. रोहित पवार यांनी दिला.

ते शुक्रवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होते. कालच्या कार्यक्रमात जयने कुठे बसायचे ही जागा ठरवणारेही हे नेतेच होते. कोणीतरी नेता काकींच्या खांद्यावर हात ठेवतो, कोणीतरी त्यांना ओढते, हे बघून आम्हाला वाईट वाटले. आम्ही याविषयी बोललो तर आम्ही राजकारण करतो, असे आरोप केले जातात, असे रोहित पवार यांनी म्हटले. त्यांनी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांना (पान ४ वर)

## संपादकीय

### राजकीय सूडबुद्धीच्या चक्रव्यूहात अडकलेल्या तपास यंत्रनांची नाचक्की!

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात रौज एव्हेन्यू कोर्टाने दिलेला निर्णय हा केवळ अरविंद केजरीवाल आणि आम आदमी पार्टीसाठी कायदेशीर दिलासा नाही, तर भारतीय लोकशाहीतील तपास यंत्रणांच्या निष्पक्षतेची आणि राजकीय शुचितेची मोठी कसोटी आहे. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी स्पेशल जज जितेंद्र सिंह यांनी केजरीवाल, मनीष सिसोदिया, के. कविता आणि इतर २१ आरोपींना पूर्ण डिस्चार्ज दिला. कोर्टाने स्पष्ट म्हटले की, कोणतीही ओव्हरआर्किंग कन्स्पिरसी किंवा क्रिमिनल इंटेंट नव्हती. सीबीआयच्या चार्जशीटमध्ये पुराव्याअभावी, आंतरिक विसंगती आणि प्रक्रियात्मक त्रुटी आढळल्या. इतकेच नाही, तर कोर्टाने सीबीआयच्या तपास अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशीचे आदेशही दिले. हा निर्णय देशभर गाजणाऱ्या या प्रकरणाला नवे वळण देतो आणि राजकीय वादळाला पुन्हा उकळी आणतो.

२०२१-२२ च्या दिल्ली मद्य धोरणात कथित अनियमितता, खासगी वितरकांना फायदा आणि आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप सीबीआय आणि ईडी ने केला होता. मनीष सिसोदिया यांच्यासह अनेक नेत्यांना अटक झाली. अखेर दिल्लीचे मुख्यमंत्री असलेल्या केजरीवाल यांनाही मार्च २०२४ मध्ये ईडी ने अटक केली. देशाच्या राजधानीतील विद्यमान मुख्यमंत्र्याला तुरुंगवास भोगावा लागणे ही घटना अभूतपूर्व होती. आपने सुरुवातीपासूनच हा राजकीय सूडबुद्धीचा कट असल्याचे सांगितले होते. आता न्यायालयीन निर्णयाने त्यांच्या भूमिकेला बळ मिळाले आहे. कोर्टाने म्हटले की, सीबीआयला ठोस पुरावे सादर करता आले नाहीत. अप्रत्यक्ष पुरावे आणि अपुरे दस्तऐवज यावर आधारित केस टिकू शकली नाही.

या निर्णयाने दोन महत्त्वाचे प्रश्न उभे राहतात. पहिला, तपास यंत्रणांची गुणवत्ता. गंभीर आरोप केले गेले, तरी न्यायालयात ते का टिकले नाहीत? दुसरा, राजकीय हेतू. विरोधी पक्षातील नेत्यांवर सीबीआय-ईडीचा वापर सत्ताधारी पक्ष राजकीय दबावासाठी करतो का? आपच्या म्हणण्यानुसार, दिल्लीत आपचे प्रभुत्व कायम राहिले म्हणून भाजपने 'जंग जंग पछाडली'. केंद्रातील सत्तेच्या हाती असलेल्या तपास यंत्रणांचा गैरवापर झाल्याच्या तक्रारी यापूर्वीही होत्या. आता हा निर्णय त्यांना हवा देतो.

इतिहासात अशा घटनांचा संदर्भ घेतल्यास हा प्रकार एकटाच नाही. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडीने खाण घोटाळ्याच्या आरोपात अटक केली होती. नंतर न्यायालयाने त्यांना जामीन दिला आणि अनेक आरोप कमकुवत ठरले. महाराष्ट्रातील काही नेत्यांवरही ईडी आणि सीबीआयच्या कारवाया निवडणुकीपूर्वी झाल्या आणि नंतर कोर्टात पुरावे अपुरे ठरले. कर्नाटक, तमिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील विरोधी नेत्यांवरही अशाच 'सिलेक्टिव्ह' तपासाची टीका झाली. सर्वोच्च न्यायालयाने स्वतः ईडीच्या काही कारवायांवर टीका करताना म्हटले होते की, अटक ही 'अंतिम उपाय' असावी, न की पहिला. २०१९ ते २०२४ दरम्यान विरोधी पक्ष नेत्यांवर ईडीने ९५% पेक्षा जास्त कारवाया केल्याचे आकडे समोर आले होते. हे आकडे स्वतः ईडीच्या वार्षिक अहवालातून आले. अनेक प्रकरणांत नंतर जामीन किंवा डिस्चार्ज मिळाला. दिल्ली मद्य धोरण प्रकरण हे या मालिकेतील ताजे उदाहरण आहे. यामुळे जनमानसात तपास यंत्रणांबद्दल संशय निर्माण होतो.

लोकशाहीत तपास यंत्रणा स्वायत्त आणि निष्पक्ष असणे गरजेचे आहे. सीबीआय आणि ईडी सारख्या संस्था भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी तयार केल्या गेल्या. मात्र जेव्हा आरोप न्यायालयात टिकत नाहीत, तेव्हा संस्थांवरील विश्वास डळमळीत होतो. दुसरीकडे, कोणताही नेता कायद्यापेक्षा मोठा नाही. चौकशी होणे चुकीचे नाही, पण ती पुराव्यावर आधारित आणि निष्पक्ष हवी. या प्रकरणाने दोन टोकांच्या भूमिका समोर आणल्या आहेत. एकीकडे 'भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर कारवाई' आणि दुसरीकडे 'राजकीय बदला'. सत्य या दोन टोकांच्या मध्ये असू शकते, पण न्यायालयीन प्रक्रियेनेच त्याचा उलगडा होतो.

या निर्णयाचा राजकीय परिणाम मोठा आहे. आप'साठी हा मोठा दिलासा आहे. आमच्यावर खोटे आरोप लावले ही भूमिका आता अधिक ठाम होईल. दिल्ली, पंजाब आणि आगामी निवडणुकांमध्ये हा मुद्दा प्रचाराचा केंद्रबिंदू ठरू शकतो. केजरीवाल यांनी निर्णयानंतर मी कट्टर ईमानदार आहे असे सांगताना भाजपला दिल्लीत निवडणुकीसाठी आव्हान दिले आहे. दुसरीकडे, भाजप आणि केंद्रीय यंत्रणांचा युक्तिवाद असा राहील की, सुटका म्हणजे निर्दोषत्वाचे अंतिम प्रमाण नव्हे; सीबीआयने हायकोर्टात अपील केले आहे. प्रक्रिया पुढे जाईल, पण पहिल्या टप्प्यातील अपयश संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे करते.

शेवटी कायद्याचे राज्य सर्वोच्च आहे. अंतिम निर्णय न्यायालयाचाच. गंभीर आरोप असतील तर भक्कम पुरावे सादर करणे आवश्यक असून ती तपास यंत्रणांची जबाबदारी आहे. राजकीय शुचिता पाळली जाणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही पारदर्शकता राखली पाहिजे.

येथे भाजपसाठी स्पष्ट संदेश आहे की, आता तरी सुधारण्याची वेळ आली आहे. केंद्रात सत्ता असताना तपास यंत्रणांचा वापर फक्त विरोधकांवर केंद्रित करणे हे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. अनेक प्रकरणांत कोर्टाने सीबीआयला 'केजरीवाला' (सरकारची कठपुतळी) म्हटले आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला 'परेड ग्राउंड' म्हटले होते. आता दिल्ली कोर्टाने तपास अधिकाऱ्याविरुद्ध कारवाईचे आदेश दिले आहेत. भाजपने हे ओळखले पाहिजे की, अशा कारवायांमुळे केवळ विरोधक नव्हे, तर स्वतःच्या पक्षाची आणि संस्थांची विश्वासार्हता खराब होते. भ्रष्टाचाराविरुद्ध लढाई खरी असावी, तर सर्व पक्षांसाठी समान निकष लावा. निवडणुकीपूर्वी 'रेड' आणि 'रेड' चा वापर राजकीय हत्यार म्हणून करणे थांबवा. संस्थांना स्वायत्तता द्या, पुराव्यावर आधारित तपास करा आणि राजकीय सूड टाळा.

दिल्ली मद्य धोरण प्रकरणातून आणखी एक धडा मिळतो. राजकारणात 'घोटाळा' आरोप सोपे आहेत, पण त्यासाठी ठोस पुरावे देणे कठीण. आपने २०२१ मध्ये धोरण आणले, ते २०२२ मध्ये रद्द झाले. लॉबीस्ट, दक्षिण गट इत्यादी आरोप झाले, पण कोर्टाने ते फेटाळले. याचा अर्थ असा नाही की सर्व सरकारी धोरणे निर्दोष आहेत. मात्र तपास यंत्रणांनी 'कन्स्पिरसी थिअरी' उभी करण्यापूर्वी पुरावे गोळा करणे आवश्यक आहे. अन्यथा जनता संस्थांवर विश्वास ठेवणार नाही.लोकशाही केवळ निवडणुका नव्हे; ती न्याय, पारदर्शकता आणि संस्थांच्या विश्वासार्हतेवर उभी आहे. केजरीवाल प्रकरणातील सुटका हा एक कायदेशीर निर्णय आहे, पण त्याचे राजकीय आणि नैतिक परिणाम दूरगामी आहेत. सीबीआय ने हायकोर्टात अपील केले आहे, त्यामुळे प्रक्रिया सुरू राहील. पण आता भाजपने आत्मपरीक्षण केले पाहिजे. विरोधकांना फक्त 'भ्रष्ट' म्हणून बदनाम करणे सोपे आहे, पण त्यासाठी संस्थांचा गैरवापर करणे महागात पडते. देशातील सर्व पक्षांनी एकत्र येऊन तपास यंत्रणांना मजबूत आणि निष्पक्ष बनवण्यासाठी कायदे करावेत. अन्यथा राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या दलदलीत लोकशाही अडकली राहील.

जनतेसमोर एकच प्रश्न उरतो की, या प्रकरणातून आपण संस्थांना अधिक मजबूत करणार आहोत की राजकीय सूडबुद्धीच्या चक्रव्यूहात आणखी अडकणार आहोत? केजरीवाल सुटका ही केवळ एका नेत्याची सुटका नाही, तर भारतीय लोकशाहीतील संस्थात्मक संतुलनाची कसोटी आहे. भाजपने आता तरी धडा घेऊन सुधारणा करावी, अन्यथा इतिहास पुन्हा उलट्या दिशेने जाईल.

# नेवासा नगरपंचायतीत प्रशासन-पदाधिकाऱ्यांचा संघर्ष शिगेला

## मुख्याधिकाऱ्यांचे 'अपात्रते'चे अस्त्र : उपनगराध्यक्षांसह नगरसेवकांचे पद धोक्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा नगरपंचायतीतील प्रशासकीय संघर्ष आता थेट लोकप्रतिनिधींच्या अपात्रतेच्या टप्प्यावर पोहोचला आहे. मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी उपनगराध्यक्षांसह संबंधित नगरसेवक व नगरसेविकांवर अपात्रतेची कारवाई करण्याचा अधिकृत प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

मुख्याधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या प्रस्तावात म्हटले आहे की, संबंधित लोकप्रतिनिधींनी शासकीय कामकाजात अडथळा आणला, शासकीय मालमत्तेचे नुकसान केले आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून गैरवर्तन केले. या घटनांबाबत नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७२/२०२६ आणि ८५/२०२६ अन्वये गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

कलम ५५-अ आणि ४२ नुसार कारवाई महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ५५-अ आणि ४२ अंतर्गत अपात्रतेची तरतूद आहे. कर्तव्यात कसूर, गैरवर्तन किंवा पदाचा गैरवापर सिद्ध झाल्यास संबंधितांना अपात्र घोषित करण्याची शिफारस मुख्याधिकाऱ्यांनी केली आहे. आता जिल्हाधिकारी या प्रकरणाचा अहवाल शासनास सादर करतील आणि त्यानंतरच पुढील दिशा स्पष्ट होणार आहे.

अपात्रतेचा हा प्रस्ताव केवळ औपचारिक प्रक्रिया नसून, त्याचे गंभीर राजकीय परिणाम होणार आहेत. जर शासनाकडून अपात्रतेचा आदेश झाला, तर नगरपंचायतीतील सत्तासमीकरणे पूर्णपणे बदलू शकतात. या संघर्षामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमधील दरी वाढली असून, नेवासा नगरपंचायतीचे ठप्प झालेले कामकाज कधी सुरळीत होणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# आजपासून भैरवनाथनगर येथे स्वयंरोजगार प्रशिक्षण : दिपाली फरगडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील भैरवनाथनगर ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच दिपाली फरगडे आणि सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने भैरवनाथनगर येथे महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

भैरवनाथनगर ग्रामपंचायत आणि सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने भैरवनाथनगर हद्दीतील ग्रामस्थांसाठी एक नवीन स्वयंरोजगारासाठी संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रशिक्षणाचा कालावधी दि.२८/०२/२०२६ पासून ०४/०३/२०२६ पर्यंत असून सकाळी १२ ते ३ या वेळेत होणार आहे. यामध्ये मधुमक्षिका पालन, मेणापासून विविध पदार्थ बनविणे , मधापासून विविध पदार्थ बनविणे अशा प्रकारचे प्रशिक्षण आयोजित केलेले आहे. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असून या प्रशिक्षणास प्रवेश घेण्यासाठी आधारकार्ड, रेशनकार्ड आणि दोन फोटो आवश्यक आहे.

तसेच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती, जॉबकार्ड धारक व्यक्ती, बचत गटातील महिला या प्रशिक्षणास प्रवेश घेऊ शकतात. यासाठी वयाची अट १८ ते ४५ आहे. सदर प्रशिक्षण गोल्ड मेडालिस्ट कांचन पाथरूडकर - क्षिरसागर या देणार आहेत. तरी या प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त ग्रामस्थांनी घ्यावा असे आवाहन भैरवनाथनगर ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच फरगडे यांनी केले आहे.

# निमगावजाळी शिवारात इनोव्हा-स्विफ्टचा भीषण अपघात; तिघे जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील निमगावजाळी शिवारात शुक्रवारी दुपारी दोन चारचाकी वाहनांच्या झालेल्या अपघातात तिघे जण जखमी झाले आहेत.स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी (दि. २७) दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास लोणीकडून संगमनेरच्या दिशेने जाणारी इनोव्हा कार आणि संगमनेरकडून लोणीच्या दिशेने येणारी स्विफ्ट कार यांच्यात निमगावजाळी शिवारातील हॉटेल न्यू तरंग नजीक जोरदार धडक झाली. त्यामुळे दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, दैव बलवत्तर म्हणून गाड्यांमधील सुरक्षिततेच्या एअर बॅग्स वेळेवर उघडल्या गेल्या, ज्यामुळे एक मोठी दुर्घटना टळली असून दैव बलवत्तर



म्हणून मोठा अनर्थ टळला आहे.

या अपघातात लोणी येथील हॉटेल व्यावसायिक गणपत भोसले यांच्यासह संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग येथील रहाटळ आणि त्यांच्या समवेत असलेला एक जण असे एकूण तिघे जण जखमी झाले आहेत. भोसले यांच्या हाताला आणि पायाला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांना तातडीने उपचारासाठी लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर जवळे कडलग येथील इतर दोन जखमींना पुढील उपचारासाठी संगमनेर येथील रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे.दरम्यान अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी समयसूचकता दाखवत तातडीने अपघातस्थळी धाव घेतली आणि जखमींना मदतकार्य केले. स्थानिक नागरिकांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे जखमींना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळण्यास मदत झाली आहे.

# विकसित भारतासाठी प्रवरा शैक्षणिक संकुलाचे कार्य दिशादर्शक : सुरज शर्मा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी, :** समृद्ध ग्रामीण भारत उभा करण्यासाठी प्रवरा शैक्षणिक संकुलाचे कार्य दिशादर्शक ठरत असून, संशोधन, स्टार्टअप, कौशल्य विकास आणि बदलत्या तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातून येथील विद्यार्थी सक्षम घडत आहेत, असे प्रतिपादन दुबईस्थित उद्योजक व माजी विद्यार्थी सुरज शर्मा यांनी केले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था संचलित प्रवरा रूरल इंजिनिअरिंग कॉलेज येथे 'तोरण २०२६' अंतर्गत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमास माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. प्रविण गंभीर, कैलास तांबे, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, डॉ. व्ही.आर. राठी आदी मान्यवर उपस्थित होते.

शर्मा म्हणाले, कौशल्याधारित शिक्षणामुळे प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालय प्लेसमेंटमध्ये अव्वल ठरत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सह नव्या तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना वेळेवर करून दिली जात असल्याने ते स्पर्धात्मक युगात सक्षमपणे उभे राहत आहेत. आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर युवकांनी विकसित भारत घडविण्यात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

शालिनीताई विखे यांनी दर्जेदार शिक्षणासोबत कौशल्य विकासावर संस्थेचा भर असल्याचे सांगितले. अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून 'नोकरी शोधणारा नव्हे, तर नोकरी देणारा विद्यार्थी' घडविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. २०२६ सालची मुलांची जनरल चॅम्पियनशीप इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाला, तर मुलींची चॅम्पियनशीप कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाला मिळाली.

प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी वार्षिक अहवाल सादर केला. सूत्रसंचालन प्रा. अतुल जोंधळे व प्रा. सायली शेळके यांनी केले, तर आभार डॉ. सचिन कोरडे यांनी मानले.

# प्रवरा हायस्कूलमध्ये ग्रंथदिंडीने मराठी राजभाषा दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** लोकनेते डॉ बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित ) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कोल्हार येथील प्रवरा हायस्कूल या सीबीएसई शाळेत आज ग्रंथ दिंडीने मराठी राजभाषा दिन साजरा झाला. कवी वि वा शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दरवर्षी विविध उपक्रमाने विद्यालयांमध्ये साजरा करण्यात येतो यावर्षी देखील मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविले. त्यामध्ये पहिलीपासून




ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील कथा संग्रह, कादंबऱ्या, कविता संग्रह, धार्मिक ग्रंथ, ललित इत्यादी मराठी भाषेमधील पुस्तकांचे पुस्तक दान केले.

प्रत्येकाच्या घरात कुठले ने पुस्तक वाचून झाल्यानंतर शिल्लक राहिलेले असते. अशी सर्व पुस्तके विद्यालयात जमा करून विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध व्हावे या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना पुस्तके दान करण्याचे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी केले.

त्यानुसार विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात पुस्तके ग्रंथालयासाठी दिली. विविध कवी ,लेखक ,नाटककार यांचे वेश परिधान करून त्यांनी केलेल्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांनी कार्यक्रमादरम्यान करून दिली.

# नेवासा ग्रामीण रुग्णालयात मानसिक आरोग्य शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर येथील मानसोपचार तज्ञ डॉ. तेजस्विनी मिस्कीन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत नेवासा ग्रामीण रुग्णालयात मोफत मानसिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात विविध मानसिक समस्यांनी त्रस्त रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार करून पालकांना ही समुपदेशन देण्यात आले डॉ. मिस्कीन यांनी सांगितले की, शिबिरात प्रामुख्याने नैराश्य म्हणजेच डिप्रेशन आणि व्यसनाधीनतेचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळले. विशेषतः दारूचे व्यसन ही गंभीर समस्या असल्याचे त्यांनी नमूद केले. कुटुंबातील ताणतणाव, वैयक्तिक अडचणी आणि मानसिक तणावामुळे अनेक जण व्यसनाकडे वळतात. नैराश्य आणि व्यसन यांचा परस्पर संबंध दिसून येतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

लहान मुलांच्या मानसिक आरोग्याबाबतही चिंता व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये एकाकीपणा आणि भावनिक अस्थिरता वाढत आहे. त्यामुळे पालकांनाही समुपदेशन देण्यात येत असून, मुलांशी संवाद वाढवण्याचा सल्ला देण्यात येत आहे. नैराश्यावर उपाय काय, या प्रश्नावर उत्तर देताना डॉ. मिस्कीन म्हणाल्या की, सौम्य लक्षणे असल्यास समुपदेशन, जीवनशैलीतील बदल, योगा आणि ध्यान यांचा मोठा फायदा होतो. मात्र परिस्थिती गंभीर असल्यास तज्ञांच्या सल्ल्याने तीन ते सहा महिन्यांचा औषधोपचार आवश्यक ठरतो. औषधे अचानक बंद करू नयेत. तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हळूहळू उपचार थांबवणे गरजेचे आहे, असा त्यांनी सल्ला दिला. आजच्या तरुण पिढीबाबत बोलताना त्यांनी 'डिसकनेक्शन' हा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे सांगितले. कुटुंबापासून दूर जाणे, स्वतःशी संवाद कमी होणे आणि सोशल मीडियाचा आक्रमक प्रभाव यामुळे चिंता आणि नैराश्य वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.



# विस्कळीत पाणीपुरवठ्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

## त्रस्त श्रीरामपूरकरांचे नगराध्यक्षांना साकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील अनेक भागांत गेल्या काही महिन्यांपासून पाणीपुरवठा अनियमित झाला आहे. नळांना पाणी कमी येणे, कधी दोन दिवस पाणी न येणे, अपुरा दाब यासारख्या समस्या वाढल्या आहेत. यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याने पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्रस्त नागरिकांनी आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्ष कांचन सानप आणि मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्याकडे केली आहे.




मिल्लत नगर, मोरगे वस्ती, संजय नगर, सेक्टर-१, निलेश नगर आदी भागांत ही समस्या गंभीर आहे. तीन दिवसांपूर्वी मिल्लत नगरमध्ये दोन दिवस पाणीच आले नाही. संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधला असता 'उंच सखल भागात मोटार चालू असल्याने पाणी तेथे जाते' असे अजब उत्तर मिळाले. सेक्टर-१ मधील नागरिकांनी नगरसेवक राजेंद्र पवार यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी पाणी विभागाशी संपर्क साधला तेव्हा 'वाल सोडणारा कर्मचारी पुरेसा वाल मोकळा करत नाही' असे सांगण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आणि शारीरिक अक्षमतेमुळे नागरिकांना पाण्याची टंचाई भासत आहे. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे सुरळीत असलेल्या पाईपलाइन खोदून ठेवल्या आहेत. त्यामुळे अचानक व्यत्यय का येतोय, याचीही चौकशी होणे आवश्यक आहे.अनधिकृत नळ कनेक्शनमध्ये झालेली वाढ आणि कर्मचाऱ्यांचा वरदहस्त यामुळे पाईपलाइनमध्ये माती जाऊन दूषित पाणी पुरवठा होत आहे. याकडे विभागाने पूर्ण दुर्लक्ष केले आहे. आगामी उन्हाळ्याची चाहूल लक्षात घेता शहरवासीयांना पाण्याचा त्रास होणार नाही, यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक करत आहेत. ाणीपुरवठा अभियंताच नाही सध्या पाणीपुरवठा विभागाकडे पूर्णवेळ अभियंता नाही. ईश्वर कुट्टी यांच्यानंतर आलेल्या महिला अधिकारी यांची बदली झाल्याने विभागाकडे अभियंता नाही. शहराच्या पाणी योजनेच्या कामावर कंत्राटी लोक देखरेख करत आहेत. भविष्यात दोष उरल्यास जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. म्हणून तातडीने पूर्णवेळ अभियंता नियुक्त करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# 'पवित्र कुरआन सर्व सृष्टी व मनाव कल्याणासाठी मार्गदर्शक'

रमजानुल मुबारक २०२६
रोजा नंबर १०

'' रमजान हा तो महिना आहेत त्या महिन्यात कुर आन अवतीर्ण करण्यात आला, जें मार्गदर्शन आहेत मानवजातीसाठी आणि मार्गदर्शनाचे सुस्पस्ट प्रमाण आणि सत्य व असत्या दरम्यान करणारी कसोटी आहेत '' ( दिव्य कुरआन, सुरहा अल बकरा आ. नं. १८५).

''आम्ही याला ( कुरआन ) ला कद्र च्या रात्रीं अवतारलं आहेत ''(दिव्य कुरआन, सुरहा अल कद्र आ. नं. ०१).

कोणत्याही वस्तूचा निर्माता वस्तूची कार्यशैली निश्चित करूनच निर्मिती करतो, त्या वस्तू हाताळायांची कशी याची मार्गदर्शक पुस्तिका (म्यानुयल ) तय्यार करतो, भुतलावर मनुष्यची निर्मिती सर्वोच्च आहेत. '' आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने ) निर्माण केले '' दिव्य कुरआन सुरहा आत - तीन आ. नं. ०४).म्हणून अल्लाह ( ईश्वर) नें मानवाने जीवनाचा उद्देश, लक्ष, आणि साध्य दर्शवण्यासाठी एक परिपूर्ण मार्गदर्शक पुस्तिका दिली त्याला ईशग्रंथ म्हणतात अर्थात दिव्य कुरआन, हो ईशग्रंथ दिव्य पवित्र कुरआन.

पैगंबर मुहम्मद स्व. यांना अल्लाह ( भगवंता) नें जन्मच सदाचारणं- सद व्यवहार - सद वर्तन - सद मार्गदर्शन करण्यासाठीच दिला असं त्यांच्या पैगंबर होण्याच्या अगोदर पासूनच दिसतं होतं, वाळवंटी अरबस्थानातील भयानक परिस्थिती पाहून त्यांच्या मनात कालहाल होत होती म्हणून ते वयाच्या २५ वर्षा पासून मक्का च्या थोडं बाजूलाच असलेल्या ओसाड डोंगराच्या'' गार हिरा '' गुहेत रात्रंदिवस अल्लाह ( भगवंत) नामस्मरण चिंतन मनन कित्येक दिवस काढत, एके दिवस अचानक अल्लाह चे ईशदूत ( फारिश्ता ) हजरत ( सन्माननिय ) जिब्राईल स.प्रकट होऊन त्यांना जोरात घट्ट मिठी मारून म्हणाले, '' वाच ! आपल्या पालनकर्त्याच्या नावाने ( आरंभ करून )ज्याने सर्वांना निर्माण केलें. दिव्य कुरआन सुरहा नं ९६,अल - अलक आ. नं. ०१,) ज्याने मानवाला गोठलेल्या ( ए क्लॉट ऑफ ब्लड -रक्तापासून )निर्माण केलं, ( ०२), पुन्हा, म्हणाले, वाच ! तुझ्या पालनकर्त्याच्या जो नावाने जो फार उदार आहे. ( ०३), ज्याने मानवाला ज्ञानप्राप्तीसाठी लेखणीचा उपयोग करणं शिकवले ( ज४), मानवाला ते सर्व शिकवले, ते त्यास माहित नव्हते. ०५)..!!!.

शिकवलं, हीं, दिव्य कुरआन ची पहिली आयात (स्लोक )आहेत, त्या वेळी आदरणीय मुहम्मद - अहमद चे प्रेषित- पैगंबर -नबी - झाले, पैगंबर प्रेषित मुहम्मद स्व. झाले. त्यावेळी त्यांचं वय चाळीस होतं. दिव्य कुरआन अवंतरलं एका अशिक्षित- निरीक्षर पैगंबर मुहम्मद स्व. वर.हा एका चमत्काराचाच व भाग्याच म्हणावे.

त्या गार गुहेतून पवित्र कुरआन चे अवतरन अरबी भाषेत कधी एक स्लोक (आयात ) तर संपूर्ण सुरहा, असं जशी -वेळ -काळ -परिस्थिती -आणीबाणीची परिस्थिती असं विविध वेळी त्या त्या परिस्थितीच्या मार्गदर्शन करण्यासाठी थोडं थोडं सतत २३ वर्षे येऊन पैगंबर मुहम्मद स्व. च्या महानिर्वाना च्या अगोदर केलेल्या शेवटीकेलेल्या हज्ज पर्यंत अवतरन चालू होतं.

विशेष गोष्ट म्हणजे प्रेषित मुहम्मद स. निरक्षर असून ते ते सर्व आयात तोंड पाठ करून आपल्या मित्रां (सहाबा )ना अयेकवायचे ( बोलून ). कालांतराने त्या सर्व स्लोक आयती मित्र (सहाबा ) लिहून अथवा तोंड पाठ करून ठेवायचे.. असें जवळपास ४२ विविध प्रकारे साठवून ठेवलेले आज पर्यंत आहेत.. असो.

२३ तेवीस वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत थोडं थोडं करून अवतरन झाले तरी त्यात कसलेही मतभेद किंवा विरोधाभास अथवा अतिरंजित नाहीं. दिव्य पवित्र कुरआन ३० तीस खंडात विभागण्यात आला आहे, त्यामध्ये ११४ एकशे चौदा अध्याय आणि ६२३६ सहा-हजार- दोन शे- छतीस आयाती अर्थात स्लोक आहेत. याची भाषा शैली अरबी भाषेतील सर्वोत्कृष्ट नमुना असून अत्यन्त सरल मधुर - काव्यमय आहेत.कुराण ज्ञानाचे मूळ स्रोत आहे, अनुपम वर्णन शैली, मनमोहक मांडणी. दिव्य कुरआन वाचताना वाचकाला असा भास वाटतोय की सृष्टी चा निर्माणकर्ता अल्लाह ( ईश्वर -भगवंत ) स्वतः आपल्याशी संवाद साधत आहे.खरोखरचं स्वतः मार्गदर्शन करत आहेत. पुन्हा विशेष म्हणजेच दिव्य कुरआन कधीहीं कितीही वेळा वाचले तर प्रत्येक वेळा काहीतरी नवीन वाचलं किंवा नवीन ज्ञान भेटल्या सारखं वाटतं. कुराण च्या कुठल्याही अध्याय उघडून वाचला तर प्रकर्षाने प्रत्येक पाठावर आपल्याला चिंतन - विचार - आणि ज्ञानाचा अथांग सागर मिळेल. त्यामध्ये ज्ञान विज्ञानाशी सुसंगत, उत्कृष्ट अध्यात्मिक व वैज्ञानिक गोष्टीचा संगम आहेत.

दिव्य कुरआन मानवी उत्पत्तीपासून सृष्टीच्या उत्पत्ती, जमीन, आकाश,अवकाश,सप्तपातळ - सप्त आकाश एवढंच नाहीतर आंतरिक्ष- अंतविश्व या विषय अनेक गोष्टीनां स्पर्श करून त्याचे तारकीक विवेचन केलेले आहेत. भौतिकशास्त्र, वनस्पती शास्त्र, भुगर्भ शास्त्र, आंतरिक्ष शास्त्र, मनाव वंश शास्त्र, अर्थशास्त्र जीवन शास्त्र, कृषी फलोद्यानशास्त्र, इत्यादी बाबतीत अधभूत सत्य मांडली आहेत.

पवित्र कुरआन नें दिलेल्या वैज्ञानिक दृष्टीकोनामुळे आधुनिक ज्ञान विज्ञान चा मार्ग प्रशस्त झाला आहेत. अर्थातच कोणत्याहीआधुनिक काळात दिव्य कुरआन मार्गदर्शन करतो.

पवित्र कुरआन चा केंद्र बिंदू हा मनाव आहेत, मानव कल्याण हाच त्याचा उद्देश आहेत. मानवी जीवनाचा उद्देश काय तर सदाचारी जीवन जगणं व दुराचाराला नष्ट करने.कुरआनच्या शिकवनीत परकोटीचं संतुलन असून त्यात अध्यात्मिकतेची आवश्यक तत्थे आणि जीवनव्यवस्थेंचे नियम, नैतीकता शिष्टाचाराचे विश्लेषण भरपूर आहे, उपसणे संबंधित विस्तृत माहिती, कौटुंबिक सामाजिक आर्थिक सांस्कृतिक, तसेच राजनैतिक आज्ञा आहेत, युद्ध व युद्धातील शिष्टाचार आणि कायदे नियम आहेत, अर्थातच मानवी जीवनाशी निगडित सर्वाथाने सर्वस्पर्शी. मानवी जीवनातील सर्व पैलूच्या सर्व समस्सेला समाधानिक उत्तम समाधान.

दिव्य कुर आन मध्ये, '' निससंदेह प्रत्येक समस्येला समाधान आहेत, निच्छितच प्रत्येक समस्सेला समाधान आहेत '' सुरहा ९४, आ. नं. ६ व, ७ ).

कुर आन हें समस्त ( सर्व,) मनाव जातीला मार्गदर्शन तसेच सत्य व असत्य दरम्यान फरक करणारी कसोटी आहेत, '' सुरहा नं ०२, अल -बकरा आ नं १८५)...



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# औद्योगिक क्षेत्राला अपेक्षित कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम सारथीने सुरु करावेत : डॉ. विखे

## मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : औद्योगिक व सेवा क्षेत्रातील वाढती मागणी लक्षात घेऊन त्या अनुषंगाने कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी सारथी संस्थेने पुढाकार घ्यावा, अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे यांनी दिल्या. मंत्रालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली सारथी संस्थेच्या संचालकांची व संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीस सारथी संस्थेचे संचालक मधुकर कोकाटे, उमाकांत दांगट, व्यवस्थापकीय संचालक सुरज मांढरे व इतर अधिकारी उपस्थित होते. उपसमितीचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर पार पडलेली ही नववी बैठक होती.



यावेळी सारथीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा व निधीच्या वापराचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मार्गदर्शन करताना मंत्री विखे म्हणाले की, समाजातील युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्य विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. उद्योजकांच्या संघटनांशी सातत्याने संपर्क ठेवून औद्योगिक क्षेत्राला आवश्यक असलेल्या मनुष्यबळाच्या मागणीनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आखावेत.

नामांकित प्रशिक्षण संस्थांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प अहवाल तयार करून हे कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, असे त्यांनी सांगितले. सारथीच्या उपक्रमांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ते सर्व पाठबळ देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने यूपीएससी पूर्व प्रशिक्षणाच्या जागा १०० वरून ४०० तर एमपीएससीसाठी ४०० वरून १,००० करण्यास मान्यता दिल्याची माहितीही त्यांनी दिली. राज्य सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ५१५ कोटी रुपयांची तरतूद केली असून, त्यापैकी ४४२ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. पुरवणी मागण्यांतून आणखी ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यात आठ वसतिगृहे उभारण्यात येत असून, त्यापैकी सहा पूर्णत्वास येत आहेत. सुमारे सहा हजार विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था येथे होणार असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून ही वसतिगृहे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सन २०२५-२६ मध्ये सारथीमार्फत ३४ योजना राबविण्यात आल्या असून, ४८,३८१ लाभार्थ्यांवर २२२ कोटी रुपये खर्च करण्यात आले. तसेच १,१७९ विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांत यश मिळवले असून, ११,९१५ प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

## द•ख•ल

### विद्यापीठात फुले निसर्ग गारवा रसवंतीचे उद्घाटन



**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या परीसरात नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या फुले निसर्ग गारवा या रसवंतीचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे मका संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस. एल. जाट, हैद्राबाद येथील भारतीय भरडधान्य संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. गंगाया, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील, मिलिंद ढोके, डॉ. नरेंद्र काशीद, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे व नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते. या रसवंतीगृहामध्ये विद्यापीठाने खास उसाच्या रसासाठी विकसित केलेला फुले १५०१२ या वाणापासून तयार केलेला बिना बर्फाचा शुद्ध व १००% नैसर्गिक ऊसाचा ताजा रस विक्रीस उपलब्ध राहणार आहे.

### दिव्यांगांना सामाजिक प्रवाहात आणणे काळाची गरज : संजय साळवे

**श्रीरामपूर** : जिद्द, प्रेरणा आणि चिकाटीच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते. दिव्यांगांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ नये यासाठी त्यांना मुख्य सामाजिक प्रवाहात आणणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन आसान दिव्यांग संघटना अपंग सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष संजय साळवे यांनी केले. येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग, मराठी व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग दिन व मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. गुंफा कोकाटे होते. साळवे म्हणाले, भाषेमध्ये माधुर्य असेल तर आपण जग जिंकू शकतो. सोशल मीडियाचा मर्यादित वापर करून पुस्तक वाचनाची सवय वाढविणे आवश्यक आहे. मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे सामाजिक, मानसिक व शारीरिक समस्या वाढत आहेत. सूत्रसंचालन प्रा. दिपाली खर्डे यांनी तर आभार प्रा. डॉ. बाबासाहेब पवार यांनी मानले.

## आनंद गुरुकुलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : आनंद गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, सात्रळ येथे थोर मराठी साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामुळे शाळा परिसरात मराठी भाषेचा अभिमान, संस्कृतीचे जतन आणि परंपरेचा जागर अनुभवायला मिळाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी मोहिनीराज तुंबारे उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद रमेश पन्हाळे यांनी भूषविले. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक व वैचारिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृती, इतिहास आणि संस्कारांची वाहक आहे, असा संदेश त्यांनी दिला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे मोहिनीराज तुंबारे यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषा व संस्कृती जतन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता जोर्वेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंजूषा घोलप यांनी केले. या कार्यक्रमास शाळेचे चेअरमन डॉ. के. के. बोरा, विश्वस्त लिलावती बोरा, व्यवस्थापन समिती अध्यक्षा अर्चना, प्राचार्या प्रधान सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये गाथा पारायण सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तीर्थक्षेत्र नेवासा येथे असलेल्या जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये तुकाराम बीजउत्सवाच्या निमित्ताने गाथा पारायण सोहळयास मंदिराचे प्रमुख महंत वाणीभूषण गुरुवर्य हभप उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.पाचवा वेद असलेल्या संत तुकोबारायांच्या गाथा ग्रंथांचे पारायण जीवनात पारायण करा असे आवाहन संत तुकाराम महाराज देवस्थानचे विश्वस्त भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांनी यावेळी बोलताना केले. मार्गदर्शक वाणीभूषण गुरुवर्य महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या पारायणाचे व्यासपीठ प्रमुख म्हणून हभप नामदेव महाराज जाधव(शास्त्री) व काका महाराज पळसवाडीकर हे सेवा देत आहे.

दि.२६ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत होत गाथा पारायण सोहळयामध्ये सकाळी ७ ते ११.३० गाथा पारायण,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ,तर रात्री ७.१५ ते १० या वेळेत संत तुकाराम महाराज मंदिराचे विश्वस्त भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद भागवत कथा असे दैनंदिन कार्यक्रम सुरू झाले आहे. तुकाराम बीजेच्या मुख्य दिवशी गुरुवार दि.५ मार्च रोजी संत तुकाराम महाराज मंदिर देवस्थानचे प्रमुख हभप उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहे.

## यशोधनमध्ये मराठी भाषा दिनानिमित्त काव्यसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयात काव्यसंमेलन व मराठी भाषा समृद्धीवरील विशेष चर्चा उत्साहात पार पडली. अध्यक्षस्थानी मा. आ. सुधीर तांबे होते. यावेळी डॉ. तांबे म्हणाले, कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा मराठी भाषा गौरव दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून मराठी ही आपली संस्कृती आणि अस्मिता आहे. भाषेला अभिजात दर्जा मिळाला असला तरी तिच्या समृद्धीसाठी शासन व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या परंपरेने मराठी समृद्ध केली असून संगमनेर पॅटर्न उभा करून साहित्य चळवळ अधिक बळकट करू, असे ते म्हणाले. सौ. दुर्गाताई तांबे यांनी मराठी भाषेचा अभिमान जपण्याचे व वाचन संस्कृती वाढविण्याचे आवाहन केले. काव्यसंमेलनात डॉ. विवेक वाकचौरे, प्रा. बाबा खरात, अशोक वालझाडे, अनिल देशपांडे, नंदकुमार बेल्हेकर, डॉ. कोमल देशपांडे, इजाज मन्सुरी, रमेश शिंदे आदी कवींनी विविध विषयांवरील कविता सादर केल्या. अनिल सोमणी यांच्या खुमासदार निवेदनाने कार्यक्रमात रंगत आली. आभार प्रदर्शन डॉ. नितीन भांड यांनी केले. साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल बाळासाहेब थोरात यांच्या कार्याचा उपस्थित साहित्यिकांनी गौरव केला.




### मराठी साहित्य समृद्धीसाठी बाळासाहेब थोरात यांचे योगदान उल्लेखनीय

बाळासाहेब थोरात यांनी सहकार, शिक्षण, कृषी व ग्रामीण विकासाबरोबरच मराठी साहित्य समृद्धीसाठी सातत्याने कार्य केले आहे. विविध साहित्यिकांना संगमनेर येथे आमंत्रित करून त्यांच्या विचारांचा प्रसार त्यांनी केला. यशवंतराव चव्हाण यांच्या वारशाचा सन्मान राखत साहित्यिकांचा गौरव करण्याची परंपरा त्यांनी जपली. नाशिक येथील मराठी साहित्य संमेलनातील त्यांचे भाषण संस्मरणीय ठरले. तसेच माजी अध्यक्ष प्रा. तारा भावाळकर व डॉ. अ. ह. साळुंखे यांची भेट घेऊन साहित्य-संस्कृती विषयक चर्चा करत साहित्यिकांना मदत करण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे साहित्यिकांनी सांगितले.

# कोपरगावकरांना कोल्हे गटाने दिलेला ‘शब्द’ हवेत

## पहिल्याच अर्थसंकल्पातून सवलती गायब!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत शब्द देतो, सर्वानुमते निर्णय घेतला आहे, आता फक्त सत्ता द्या अशा भावनिक साद घालत आणि घोषणांचा भडीमार करत सत्ता मिळवणाऱ्या कोल्हे गटाचा खरा चेहरा अवघ्या ६० दिवसांतच जनतेसमोर आला आहे. सत्तेवर येण्यापूर्वी कोपरगावकरांना दिलेला शब्द आणि दाखवलेला विश्वास पहिल्याच सर्वसाधारण सभेत हवेत विरल्याचे पाहायला मिळत असून कोल्हे गटाकडून कोपरगावच्या जनतेची शुद्ध फसवणूक होत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत विवेक कोल्हे यांनी कोपरगाव शहरात ज्या महिलांच्या नावाने घरे आहेत त्यांच्या घरपट्टीत ५० टक्के सवलत देण्याचे जाहीर केले होते.

तसेच कोपरगाव नगरपरिषदेच्या शाळेत ज्या कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत त्यांच्या घरपट्टी व पाणीपट्टीत २० टक्के सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय सर्वानुमते घेतल्याचा दावा त्यांनी केला होता. या आश्वासनांमुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांनी कोल्हे गटावर विश्वास टाकला. मात्र बुधवारी (दि. २६) कोपरगाव नगरपरिषदेचा सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष पराग संधान यांच्या अध्यक्षतेखाली सादर करण्यात आला आणि कोपरगावकरांचा भ्रमनिरास झाला. या सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात महिलांच्या ५० टक्के सवलतीसाठी किंवा शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी जाहीर केलेल्या २० टक्के सवलतीसाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही.

अर्थसंकल्पात या सवलतींचा साधा उल्लेखही नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी सभेत सडेतोड सवाल उपस्थित केला. निवडणुकीत जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी अर्थसंकल्पात काय तरतूद केली आहे? अशी विचारणा केली असता सत्ताधाऱ्यांनी त्यांचे बोलणे थांबवून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. लोकशाहीच्या मंदिरात जर लोकप्रतिनिधींना जनतेच्या हिताची चर्चा करू दिली जात नसेल तर सत्ताधारी नेमका कोणता विकास करत आहेत? असा संतप्त प्रश्न आता कोपरगावकर विचारत आहेत. सत्ता स्थापन होऊन ६० दिवस उलटून गेले तरी कोल्हे गटाने नागरिकांना दिलेले एकही वचन पूर्ण केलेले नाही. खोटं बोल पण रेटून बोल या वृत्तीने निवडणुकीत मते लाटली गेली मात्र आता अंमलबजावणीच्या वेळी सोयीस्कर मौन पाळले जात आहे. भूलथापा देऊन मिळवलेली सत्ता कोपरगावच्या प्रगतीसाठी की केवळ खुर्चीसाठी अशा उलटसुलट चर्चा कोपरगावात रंगल्या आहे.

# श्रीरामपूर तालुक्यात ‘महाराजस्व समाधान शिबिरा’चा शंखनाद

## तहसीलदारांचा ‘ॲक्शन प्लॅन’

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राज्यातील महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करण्यासाठी राज्य शासनाने ’छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’ अभियान (टप्पा क्र. १) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्याचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी तालुक्यातील सहा मंडळांमध्ये या शिबिरांचे वेळापत्रक जाहीर केले असून, प्रशासकीय यंत्रणेला पूर्वतयारीचे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र शासन

प्रशासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेचे प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध दाखले, योजनांचे लाभ आणि प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी ग्राम स्तरावर व्यापक प्रचार व प्रसिद्धी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यावेळी दि. ७ मार्च २०२६ रोजी कारेगांव ग्रामपंचायत परिसर, दि. १४ मार्च २०२६ रोजी बेलापूर जे.टी.एस. हायस्कूल, दि. १० एप्रिल २०२६ रोजी टाकळीभान सावता महाराज मंदिर परिसर, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी उंदीरगाव हनुमान मंदिर परिसर, दि. ८ मे २०२६ रोजी उत्सव मंगल कार्यालय श्रीरामपूर, दि. १५ मे २०२६ रोजी डावखर मंगल कार्यालय भैरवनाथनगर याठिकाणी तालुक्यातील नागरिकांच्या सोयीसाठी मंडल स्तरावर सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

> जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन आपल्या दारी या संकल्पनेतून ही शिबिरे राबवण्यात येत आहेत. तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिरांचा लाभ घ्यावा.
>
> **मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार, श्रीरामपूर.**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर ३२/२०२६
नेवासा दिनांक ११/०२/२०२६

अर्जदार श्री श्रीम-राहुल राजेंद्र साळवे रा. भानसहिवरा ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. बबनभाई नाथु साळवे यांना महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९०० चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे. अ.क्र.-१, जन्म- मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. बबनभाई नाथ साळवे, गावाचे नाव-भानसहिवरा, मृत्यु दिनांक २८/०६/२०२०.

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का) **तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहीर निविदा

### ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी

**ता. कोपरगांव, जि.अहिल्यानगर.**

ग्रामपंचायत कोळपेवाडी ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार ,पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | निविदा रक्कम | काम पुर्ण | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोळपेवाडी वार्ड नं.१ मध्ये रस्ता काँक्रिटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | २,६९,०२२ | ६ महिने | सु. बे. |
| २ | मौजे कोळपेवाडी येथे वार्ड नं ५ मध्ये आर.सी.सी.गटार करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | ४,२३,३१९ | ६ महिने | ओपन |
| ३ | मौजे कोळपेवाडी येथे वार्ड क्रमांक २ मध्ये काँक्रिटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | ३,२०,३६६ | ६ महिने | सु.बे. |
| ४ | मौजे कोळपेवाडीआरोग्य उपकेंद्र येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | २,५२,०७६ | ६ महिने | ओपन |
| ५ | मौजे कोळपेवाडी येथे वार्ड नं ३ मध्ये आर.सी.सी.गटार करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | २,९३,१७० | ६ महिने | मजुर सोसायटी |
| ६ | मौजे कोळपेवाडी येथे गाव अंतर्गत आर सी सी गटार करणे , चेंबर दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ | ३,०८,९२४ | ६ महिने | मजुर सोसायटी |

**अटी व शर्ती** - १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.२८/२/२०२६ते ७/३/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. ९/३/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**कोळपेवाडी, ग्रामपंचायत ता. कोपरगाव.**

### ग्रामपंचायत कार्यालय, सोनेवाडी ता. कोपरगांव, जि.अहिल्यानगर.

दिनांकः २६/०२/२०२६

ग्रामपंचायत सोनेवाडी, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद बी-१ निवीदा दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**योजना-१५वा वित्त आयोग (सन २०२४-२०२५)**

| अ.नं | कामाचे नाव | योजनेचे नाव | रक्कम रू. | निवीदा फी | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे सोनेवाडी येथे आर.ओ. प्लॅन्ट दुरूस्ती करणे | १५वा वित्त आयोगसन २०२४-२५ | ८४५९९.०० | २३६/ | ३ महिने | सु.बे |

**अटी व शर्ती**-१. निवीदा फी व माहितीपत्रक कार्यालयात दि.२७/०२/२०२६ ते दि.०७/०३/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २. सिलबंद निवीदा दि.०७/०३/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. ३. निवीदा दि.०९/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० ग्रामपंचायत कार्यालय येथे उघडण्यात येतील. ४. निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

## जाहीर नोटीस

नि.६

वा.चौ.अ.नं. : ५२ /२०२५

ॲड.एस.ए.राठोड
बी.ए. (इंग्लिश) एल.एल.बी.
राणेगाव, ता. शेवगाव

शेवगाव येथील मे.सिव्हील जज्ज साहेब, यांचे कोर्टात
पु.ने.ता. १६/०३/२०२६

**अर्जदार** : स्वप्निल बाळासाहेब भेंडेकर व इतर
**सामनेवाले : कोणीही नाही**

ज्याअर्थी मयत कौसाबाई बापूराव भेंडेकर या दि.१२/०३/२०२४ रोजी मौजे भातकुडगाव, ता शेवगाव येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांचे वारस मयत बाळासाहेब बापू भेंडेकर हे दिनांक ०७/०२/२००६ मयत झालेले आहेत. व मयत नामे सविता बाळासाहेब भेंडेकर ह्या मयत बाळासाहेब बापू भेंडेकर यांच्या पत्नी दिनांक २५/०४/२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस अर्जदार नं. १ स्वप्निल बाळासाहेब भेंडेकर व अर्जदार नं. २ ऋषिकेश बाळासाहेब भेंडेकर यांनी मयत बाळासाहेब बापू भेंडेकर व मयत सविता बाळासाहेब भेंडेकर यांची मुले तसेच मयत कौसाबाई बापूराव भेंडेकर यांचे नातू म्हणून व अर्जदार नं. ३ नंदाबाई सदाशिव गाडेकर यांनी मयत कौसाबाई बापूराव भेंडेकर यांचे मुलगी म्हणून वारसांचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी यदाकदाचित मयत कौसाबाई बापूराव भेंडेकर व मयत बाळासाहेब बापू भेंडेकर तसेच मयत सविता बाळासाहेब भेंडेकर यांचे अन्य इतर कोणी या अर्जदारा व्यतिरिक्त कोणी वारस आहेत असे कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध होताच ३० दिवसांचे आत आपल्या लेखी हरकती आपण स्वतः किंवा आपले वकिला मार्फत या प्रकरणामध्ये या मे. कोर्टात हजर होवून लेखी हरकती कळवाव्यात. तसेच सदर अर्जाची पुढील तारीख १६/०३/२०२६ असून सदर तारखेच्या दिवशी अथवा सदर नोटीस सदरच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकती घ्याव्यात. यदाकदाचित कोणीही ३० दिवसाचे आत या प्रकरणात मे. कोर्टात हजर होवून लेखी हरकती कळविल्या नाहीतर हे मे. कोर्ट अर्जदाराचा पुरावा ऐकून घेवून कायद्याप्रमाणे पुढील योग्य तो आदेश पारित करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज रोजी दि. २७/०२/२०२६ कोर्टाच्या शिक्याने व माझ्या सहीने देत आहे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**क. लिपिक**
**दिवाणी न्यायालय क स्तर शेवगाव**

(शिक्का)

**हुकुमावरून**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर शेवगाव**

## जाहीर समन्स

निशानी नं. २८
दि.२७/०२/२०२६
नेमलेली तारीख : २१/०४/२०२६.

ॲड.एस.बी.लवांडे
नेवासा कोर्ट

३ रे नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी यांचे कोर्टात
रे.मु.नं. २७२/२०२३

**वादी-** कुसुम सुर्यभान बनकर
**प्रतिवादी -** अंतिका येशु जगदाळे वगैरे

वरील वादी यांनी सदरचा दावा सरस निरस मानाने वाटप होवुन कब्जा मिळण्यासाठी, जाहिर ठरावासाठी, व तदनुषंगिक मनाई हुकुमासाठी प्रतिवादी विरुध्द या मे. कोर्टा मध्ये दाखल केलेला असुन, प्रतिवादी नं. ४ सिंधुबाई सुभाष साळवे, रा. गजराजनगर, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर हि या पत्यावर कायम रहात असुन ती मे. कोर्टाचे समन्सची बजावणी होवु देत नाही, ती जाणिवपुर्वक समन्स घेत नाही, व समन्स घेण्यास टाळाटाळ करीत आहे. तरी या जाहिर नोटीसीने प्रतिवादी नं. ४ सिंधुबाई सुभाष साळवे, रा. गजराजनगर, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर यांना कळविण्यात येते की, आपण सदर जाहिर समन्स / नोटीस प्रसिध्द होताच एक महिन्याच्या आत किंवा नेमलेली दि. २१/०४/२०२६ पर्यंत या न्यायालयात स्वतः अगर वकिलां मार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे, अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील दाव्याची सुनावणी होवुन योग्य तो हुकुम केला जाईल, त्याची नोंद घ्यावी. आज दि. २७/०२/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली ता.२१/०४/२०२६

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर नेवासा**

(शिक्का)

**हुकुमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, नेवासा**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर २२/२०२६
नेवासा दिनांक ३०/०१/२०२६

अर्जदार श्री श्रीम-शौकत कदीर शेख रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शौकत कदीर शेख रा. सोनई यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-शौकत कदीर शेख, गावाचे नाव-सोनई, जन्म दिनांक-२५/०५/१९७९ करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का) **तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर २३/२०२६
नेवासा दिनांक ३०/०१/२०२६

अर्जदार श्री श्रीम- शाईन कदीर शेख रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शाईन कदीर शेख रा. सोनई यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव- शाईन कदीर शेख, गावाचे नाव-सोनई, जन्म दिनांक-०१/०७/१९७५ करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का) **तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर २४/२०२६
नेवासा दिनांक ३०/०१/२०२६

अर्जदार श्री श्रीम-कय्युम कदीर शेख रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. कय्युम कदीर शेख रा. सोनई यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कय्युम कदीर शेख, गावाचे नाव-सोनई, जन्म दिनांक-०१/०६/१९७७ करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का) **तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# चार दशकांचा रखडलेला प्रश्न निकाली

## सात्रळमध्ये विकासाचा निर्णायक 'टर्निंग पॉइंट'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील जुन्या बाजारपेठेतील तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्याने बाजारपेठेत नवचैतन्य निर्माण झाले आहे. वर्षानुवर्षे आश्वासने देत हा प्रश्न प्रलंबित ठेवणाऱ्यांना या कामामुळे अप्रत्यक्ष चपराक बसल्याची चर्चा पंचक्रोशीत रंगली आहे.

जुन्या बाजारपेठेतील मुख्य रस्ता पावसाळ्यात चिखलाचा डोह बनत होता, तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य होते. यामुळे नागरिक, ग्राहक व व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. वाहतूक कोंडी, किरकोळ अपघात, दुकानांतील मालाचे नुकसान आणि घटती ग्राहक वर्दळ यामुळे बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात आले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की काही व्यावसायिकांनी लोणी व कोल्हार येथे स्थलांतर करण्याचा मार्ग स्वीकारला.

या प्रश्नावर अनेक वर्षे केवळ राजकारण झाले. बैठका, निवेदने, आश्वासने यापलीकडे ठोस कृती झाली नाही. काही काळ कामाला सुरुवात झाली; मात्र विविध कारणांनी ते पुन्हा रखडले. विकासाऐवजी अडथळे निर्माण करण्याचे प्रयत्न झाल्याचीही चर्चा स्थानिक स्तरावर होती. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती.



दरम्यान, मंत्री विखे यांच्या पुढाकारातून या कामासाठी निधी उपलब्ध झाला. प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करत कामाला गती देण्यात आली. रेंगाळलेल्या प्रश्नावर विकासाचा निर्णय घेतल्याने चित्र पालटले आणि कॉंक्रिटीकरणाचे काम अल्पावधीत पूर्ण झाले. पुढील अनेक दशकांचा विचार करून दर्जेदार बांधकाम करण्यात आल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

रस्ता सुस्थितीत झाल्याने बाजारपेठेतील वाहतूक सुरळीत होणार असून ग्राहकांची वर्दळ वाढेल, असा विश्वास व्यापाऱ्यांनी व्यक्त केला. स्वच्छता आणि सौंदर्यीकरणातही भर पडल्याने परिसराचे रूपडे बदलले आहे. विकासाला विरोध करणाऱ्यांना नागरिकांनी आता उत्तर देण्याचे ठरविले आहे, अशी भावना काही व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. अनेकांनी हे काम 'टर्निंग पॉइंट' ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

## पान १ वरुन

### न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवा; देशासाठी काम करा

पान १ वरुन

हा न्यायव्यवस्थेवर चालणारा देश आहे. जाती-धर्म विविधता असलेल्या या विशाल देशात न्यायव्यवस्था नसेल तर अराजकता माजेल. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने न्यायालयीन निर्णयावर विश्वास ठेवला पाहिजे. केजरीवाल यांनी जेलमधून सुटल्यानंतर भारतीय जनता पक्षावर केलेल्या आरोपांबाबत विचारले असता अण्णा म्हणाले, मी राजकारणात पडत नाही. कोण कोणावर आरोप करतो यात मला रस नाही. अरविंद केजरीवाल हे माझे जुने कार्यकर्ते आहेत. त्यांनी आता फक्त पक्षाचा विचार न करता देश व समाजाच्या भल्यासाठी काम करावे. स्वातंत्र्यासाठी अनेकांनी आहुती दिली आहे, ते विसरू नये.

### शिखर बँक घोटाळाप्रकरणी क्लोजर रिपोर्ट स्वीकारला

२५ हजार कोटींचा घोटाळा? २५,००० कोटींचा कथित शिखर बँक घोटाळ्याप्रकरणी ही मोठी अपडेट आहे. सन २००२ ते २०१७ दरम्यान या साखर कारखान्यांनी कर्जफेड न केल्यामुळे शिखर बँकेला २५,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. कर्ज वसुलीच्या नावाखाली चडउइ ने साखर कारखाने आणि त्यांची जमीन कवडीमोल भावात लिलावात विकली हे बहुतांश व्यवहार बँकेचे प्रमुख असलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनाच करण्यात आले होते. त्यामुळे, तत्कालीन विरोधक असलेल्या भाजपने हा मुद्दा घोटाळा म्हणून उपस्थित केला होता.बनून शिंदे-फडणवीस महायुती सरकारसोबत येताच पोलिसांनी पुन्हा भूमिका बदलली. विधानसभा निवडणुकांच्या अगोदर पुन्हा एकदा मुंबई पोलिसांनी कोर्टात नव्याने अर्ज दाखल केला. शिखर बँक घोटाळा प्रकरणातील विरोध याचिका रद्द करण्याकरता मुंबई पोलिसांनी कोर्टाकडे नव्यानं अर्ज केला होता.

आता, विशेष न्यायालयाने शिखर बँक घोटाळाप्रकरणी क्लोजर रिपोर्ट स्वीकारल्याने सुनेत्रा पवारांशी निगडित कंपनीसह दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उर्वरित ७० जणांना क्लीनचीट मिळाली आहे. या क्लोजर रिपोर्ट विरोधात अण्णा हजारेंसह इतरांनी दाखल केलेल्या निषेध याचिकाही (प्रोटेस्ट पीटिशन) विशेष न्यायालयाने फेटाळल्या आहेत.

### कोणी सुनेत्रा काकींच्या खांद्यावर हात टाकतो, कोणी ओढतो...

अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले. काल एक महाशय बोलले राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये एक नवीन पर्व सुरु झाले आहे. पण अजितपर्व कधी संपणार नाही. लोकांच्या मनात दादांबद्दल प्रेम कायम राहील. तसेच त्यांच्या अपघाताविषयी लोकांच्या मनात शंका आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले.

अजितदादा पक्षातील जे चार लोक आहेत, ते फक्त विलीनीकरणाच्या विषयाची चर्चा घडवून आणतात. कारण त्यांना स्वत:चं महत्त्व टिकवून ठेवायचे आहे. सुनेत्रा काकी राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. त्यामुळे स्टेजवर सुनेत्रा काकींशी वागत असताना इतर गोष्टीत सांभाळून वागा, महाराष्ट्र बघतोय. अजितदादांचा वचक काय असतो, हे सगळ्यांना माहिती आहे. अजितदादांचे कार्यकर्ते आणि आमदारांवर प्रेम होते. पण हे जे चार नेते आहेत, त्यांच्यावर अजितदादांचा वचक होता.

मला सुनेत्रा काकींविषयी आदर आहे, त्या मोठ्या नेत्या आहेत. त्या अजितदादांसारखं काम करतील, हा विश्वास आहे. इतर नेत्यांनि त्यांच्याशी बोलताना सांभाळून वागावं आणि बोलावं. मी काल सुनेत्रा काकींचं भाषण ऐकलं, त्यांनी चांगले मुद्दे मांडले. बाकीच्यांच्या भाषणात ऐकण्यासारखे काही नव्हते, पूर्वीही त्यांच्या भाषणांमध्ये काही नसायचे, त्यामध्ये महत्त्वाचं काही नसते. काल अजितदादांच्या पक्षाच्या कार्यक्रमात काय घडलं, हे माहिती नाही. पण सुनेत्रा काकी या सक्षम महिला आहेत. त्या पवार कुटुंबाचा घटक आहेत. त्या पत्रकार परिषदेत बोलू शकतात, प्रश्नांना सामोऱ्या जाऊ शकतात. कोणाला वाटत असेल आपण अजितदादांना कंट्रोल करु शकत नव्हतो, पण सुनेत्रा काकींना कंट्रोल करु. तर ते भ्रमात आहेत. थोड्याच दिवसांनी त्यांची ताकद कळेल, असे रोहित पवार यांनी म्हटले.

### दिल्ली मद्य धोरण घोटाळा

संबंधित होते. या पार्श्वभूमीवर सीबीआयने गुन्हा दाखल केला होता. नंतर ईडीने मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपांवरून स्वतंत्र कारवाई केली. या प्रकरणात आम आदमी पक्षाच्या अनेक नेत्यांना अटक झाली होती आणि जामीन अर्जही अनेकदा फेटाळण्यात आले होते. न्यायालयाच्या या निर्णयामुळे केजरीवाल आणि सिसोदिया यांना मोठा दिलासा मिळाला असून पक्षावरील कायदेशीर दबाव काही प्रमाणात कमी झाल्याचे मानले जात आहे.

# आ. बंब यांच्या सहकार्यातून तलावाला पाणी;

## दोन हजार एकर शेतीला दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापुर :** आ. प्रशांत बंब यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांच्या हितासाठी नामकाच्या पाटातून पाझर तलावात पाणी सोडण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गंगापूर तालुक्यातील संजरपुर-हदियाबाद शिवारातून नांदूर मधमेश्वरचा पाट जात असताना अवघ्या ३०० मीटर अंतरावर असलेल्या पाझर तलावांमध्ये पाणी उपलब्ध नव्हते. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी आमदार बंब यांच्याकडे नामकाच्या पाटातून तलावात पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आमदार बंब यांच्या प्रयत्नातून सुमारे ३०० मीटर दीड फूटाची पाईपलाईन टाकून कोणत्याही विद्युत मोटारीचा वापर न करता तलावात पाणी सोडण्याची व्यवस्था केली. तलावात पाणी पोहोचल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून या तलावामुळे सुमारे २००० एकर शेतीला फायदा होणार असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी आमदार बंब यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.यावेळी कृष्णकांत व्यवहारे, संदीप पवार, सागर सोनवणे, गणेश सुकासे, ज्ञानेश्वर सोनवणे, अमोल जीवरक, मच्छिंद्र सुकासे, अशोक वारकर आदी शेतकरी उपस्थित होते.



## निधन वार्ता

### गं.भा. सुभद्राबाई थोरात



**श्रीरामपूर :** तालुक्यातील उक्कलगाव येथील जुन्या पिढी जेष्ठ गं.भा.सुभद्राबाई शंकरराव थोरात (वय ११५) यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले.त्यांच्या पश्चात तीन मुले,चार मुली,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. खा. गोविंदराव आदिक शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक आप्पासाहेब थोरात तसेच प्रगतशील शेतकरी हरिभाऊ थोरात,बाबासाहेब थोरात यांच्या मातोश्री होत.

# श्रीरामपूरात शैक्षणिक क्षेत्रातील नव्या प्रवाहांवर मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने बदलणारे प्रवाह, नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी आणि शाळा नेतृत्वातील कौशल्यविकास या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी 'सक्षम इंटरनॅशनल बॉडी ऑफ स्कूल प्रिन्सिपल्स'तर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. देववाणी ग्रुप ऑफ कंपनीज यांच्या उपक्रमातून हा कार्यक्रम राबविण्यात येत असून, शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी तो एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

देशभरातील शैक्षणिक नेत्यांना एकत्र आणून शैक्षणिक धोरणांवर सामूहिक आवाज निर्माण करणे, जागतिक दर्जाच्या व्यावसायिक विकासाला चालना देणे आणि उत्कृष्ट शैक्षणिक पद्धतींची देवाणघेवाण करणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय शिक्षण परिसंस्थेला अधिक सक्षम व प्रभावी बनविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे.

या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी संजीवन दिवे व कंपनीचे सीईओ हरीश नागपाल उपस्थित राहणार असून, प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. नेहा मकवाना मार्गदर्शन करणार आहेत. उद्घाटनानंतर पॅनेल चर्चेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रातील नव्या संकल्पना, आव्हाने आणि संधी यावर सविस्तर चर्चा होणार आहे. हा कार्यक्रम दि. ८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता अपूर्वा कॉम्प्लेक्स, अपूर्वा हॉटेल, कॅनाल रोड, श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

# स्कॉँफ मूल्यमापनात प्रवरा पब्लिक स्कूल जिल्ह्यात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (स्कॉँफ) मूल्यमापनात अहिल्यानगर जिल्ह्यातून प्रवरा पब्लिक स्कूलने प्रथम क्रमांक मिळवला आहे. ही माहिती शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

भौतिक सुविधा, अध्ययन-अध्यापन पद्धती, शैक्षणिक साहित्य निर्मिती, सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळा, क्रीडांगणे तसेच सहशालेय उपक्रम आदी निकषांवर हे मूल्यमापन करण्यात आले. जिल्ह्यातील १२ शाळा पात्र ठरल्या असून, त्यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूलने 'ए प्लस' श्रेणीसह सर्वाधिक गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले. मागील वर्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानातही शाळेने उल्लेखनीय यश मिळवले होते.

विठ्ठलराव विखे यांनी गरजू विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण मिळावे या उद्देशाने शाळेची स्थापना केली. सर्वांगीण व संस्कारक्षम शिक्षणामुळे शाळा राज्य व राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

# लाल बावट्याच्या राजुर लॉंग मार्चची यशस्वी सांगता

## कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीसह आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत निर्णय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आधि :** किसान सभा व सीटू कामगार संघटना यांच्या वतीने दिनांक २४ फेब्रुवारी रोजी अकोले तालुक्यातील राजुर येथून निघालेल्या मोर्चाची संगमनेर तालुक्यातील निझर्णेश्वर येथे आज २७ फेब्रुवारी रोजी दुपारी यशस्वी सांगता झाली.

अर्धवेळ परिचरांना २ हजार रुपये व शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना १ हजार रुपये वेतनवाढ, भंडारदरा धरणाचे पाणी परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांना पिण्यासाठी व सिंचनासाठी शासकीय योजनेतून उपलब्ध करून देण्यासाठी सर्वेक्षणाचे आदेश, वन जमिनी व घरांच्या तळ जमिनी श्रमिकांच्या नावे करण्यासाठी झालेल्या राज्यस्तरीय निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी, बांधकाम कामगारांना शस्त्रक्रिये बरोबरच इतर सर्व आजारांसाठी कुटुंब मेडिक्लेम योजना मान्य करण्यात आल्याने लॉंग मार्चची यशस्वी सांगता करण्यात आली.

तीन दिवस ५८ किलोमीटरचा पायी प्रवास करून हा लॉंग मार्च नगर जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या गावाच्या वेशीवर धडकला होता. लॉन्ग मार्चमध्ये आदिवासी शेतकरी, कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लॉन्ग मार्चच्या माध्यमातून उपस्थित केलेले प्रश्न सोडवण्यासाठी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी मुंबई मंत्रालयामध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, व विविध खात्याचे अधिकारी पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये बैठक पार पडली होती. या बैठकीत काही प्रश्न अनिर्णित राहिले होते.

वेतन वाढीसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक तरतुदीसाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये विषय मांडण्याची आवश्यकता होती तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या मान्यतेची आवश्यकता होती. त्यामुळे बैठकीनंतरही लॉंग मार्च सुरूच ठेवण्यात आला होता.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांच्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांची दुसऱ्या दिवशी भेट घेऊन या बाबतचा विषय उपस्थित केला. तसेच त्याच दिवशी सायंकाळी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीतही हे विषय ठेवण्यात आले.

# उद्या डॉ. अण्णासाहेब शिंदे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील श्रीरामपूर नगर परिषदेच्यावतीने भारताचे कृषीतज्ञ व केंद्रीय कृषिमंत्री डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त उद्या रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरचा कार्यक्रम उद्या रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आझाद मैदान श्रीरामपूर येथे होणार आहे

या व्याख्यानमाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात राहणार असून त्या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत संजय आवटे हे असणार आहेत. या कार्यक्रमप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मीनाताई जगधने, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, माजी आ. भानुदास मुरकुटे, आ. हेमंत ओगले, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, बाबासाहेब दिघे, ज्ञानेश्वर मुरकुटे, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, कॉंग्रेस तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले आदी उपस्थित राहणार आहेत.

तरी या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन नगराध्यक्ष करण ससाने, उपनगराध्यक्ष कांचनताई सानप, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप व पालिकेचे सर्व नगरसेवक यांनी केले आहे.

# कळंब येथे चोरट्यांचा धुमाकुळ ; बंद घरात चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील कळंब परिसरात गेल्या आठ दिवसांपासून अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून बंद घरे, छोटी दुकान आणि दुचाकी गॅरेज यांची कुलपे तोडून चोरी केल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. दागिने, रोख रक्कम आणि दुचाकी असा मिळून अंदाजे तीन लाख रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपंग प्रहार संघटनेचे कोषाध्यक्ष मोहन उर्फ बाळू बबन भालेराव यांचे छोटे दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडले. दुकानातील सुमारे दोन हजार रुपये रोख रक्कम तसेच पाच हजार ते सहा हजार रुपयांचे खाण्याचे साहित्य आणि इतर किरकोळ घरगुती वस्तू चोरीला गेल्या आहेत. महानुभावमळा येथील प्रशांत दिलीप भालेराव यांचे बंद घरही फोडण्यात आले. मात्र घरात मौल्यवान वस्तू नसल्याने मोठे नुकसान टळले. तावजीमळा येथील दशरथ गणपत भालेराव यांच्या बंदिस्त बंगल्याचे कुलूप कटरने कापून घरात प्रवेश करण्यात आला. बंगल्यातील दोन नथा, एक वाटी, सोन्याचे मणी, एक अंगठी, दोन कुड्या असा अंदाजे एक ते सव्वा तोळे सोन्याचे दागिने, पंधरा तोळे चांदीचे दागिने (चार जोडवी, चार पैंजण जोड, कंबर साखळी) तसेच ४० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण सुमारे दोन लाख तीस हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. याशिवाय श्रीराम ऑटोमोबाईलचे गणेश वायाळ यांच्या दुकानाचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. कुलूप न तुटल्याने दरवाज्याची अर्धवट फळी तोडण्यात आली. त्यामुळे किरकोळ नुकसान झाले असले तरी मोठी चोरी टळली. कळंब येथील ओम शांती केंद्राचेही कुलूप तोडण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला. मात्र आवाज झाल्याने नागरिकांनी आरडाओरडा केल्यामुळे चोरटे पसार झाले.

# अखिल भारतीय टेनिस स्पर्धेत अहिल्यनगरचा प्रणव कोरडे विजेता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हैदराबाद :** हैदराबाद येथील ऍश टेनिस अकादमीत २३ ते २७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडलेल्या 'आयटा पुरुष एक लाख राष्ट्रीय टेनिस' स्पर्धेत अहिल्यनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील खेडले काजळी येथील प्रतिभावान खेळाडू प्रणव कोरडे याने पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले. २७ फेब्रुवारीला झालेल्या अंतिम सामन्यात नामांकित खेळाडू शिवदीप कोसराजू याचा ७-५, ७-५ असा सरळ सेटमध्ये पराभव करत प्रणवने सर्वांना आश्चर्यचकित केले.

स्पर्धेत प्रणवने शानदार कामगिरी केली. पहिल्या फेरीत नैसिक रेड्डी याचा ३-६, ७-६, ७-४ असा पराभव केला. दुसऱ्या फेरीत अनिश रांजळकर याला ७-६ (१२-१०), ६-४ ने नमवले. उपांत्यपूर्व फेरीत राजेश्वर रेड्डी याचा ६-२, ६-१ असा सहज पराभव केला. उपांत्य फेरीत वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीर्थ शशांक याला ६-३, ६-० (२-० निवृत्त) असा एकतर्फी पराभव देत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यातही प्रणवने अतिउच्च दर्जाची खेळी करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

प्रणव कोरडे याचे प्रशिक्षण गजेंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सध्या तो हैदराबाद येथील सुरेश कृष्णा टेनिस अकादमीत आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी करत आहे. या यशामुळे प्रणवचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.नुकताच संभाजीनगर उच्च न्यायालय बार असोसिएशनच्या वतीने प्रणवचा सत्कार करण्यात आला होता. महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत, ग्रामीण पोलीस आयुक्त विनायक कुमार राठोड, उद्योगपती हिराभाई दोशी, देवगिरी प्रांत अधिवक्ता परिषद अध्यक्ष ॲड. श्रीकांत अदवंत, सीनियर कौन्सिल संजीव देशपांडे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य सरकारी वकील ॲड. अमरजीत गिरासे यांनी प्रणवचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. प्रणव कोरडेच्या या यशाने महाराष्ट्राच्या टेनिसला नवी ओळख मिळाली आहे.




## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि . २८ फेब्रुवारी २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-१ | १४६<br>४७०<br>३४४ | जोड<br>५८-०१-२७-६४-१९ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२५<br>२६०<br>४४० | ८-२ | १५६<br>१२९<br>११० | जोड<br>८६-४२-०१-५३-२९ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| २९०<br>४९०<br>५६० | १-० | १९०<br>२८०<br>४६० | जोड<br>१३-६०-२७-९५-०८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## काकडे महाविद्यालयात व्याख्यानमाला संपन्न

**ढोरजळगांव** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, बहिशाल शिक्षण मंडळ आणि निर्मलाताई काकडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बहिशाल शिक्षण मंडळांतर्गत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. या व्याख्यानमालेचा उद्देश विद्यार्थ्यांचा बौद्धिक, सामाजिक व शैक्षणिक विकास घडविणे हा होता. सीमा जोशी, प्रा.सोनवणे विजय यांनी या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना सकारात्मक विचारसरणी, भावनिक समतोल आणि सामाजिक नातेसंबंधांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निकिता बोरुडे यांनी केले. प्रस्ताविक केंद्र कार्यवाहक प्रा. माधुरी पोटफोडे यांनी केली तर आभार प्रा. गायके आनंद व प्रा. कोमल कापसे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री गोरक्षनाथ गड मंदिर कलशरोहण सोहळ्याचा प्रारंभ उत्साहात



**अहिल्यानगर** : अहिल्यानगरपासून सुमारे २० किमी अंतरावरील मांजरसुंबा येथील श्री गोरक्षनाथ गड मंदिर येथे कलशरोहण सोहळ्याची सुरुवात दिंडी सोहळ्याने भक्तीमय वातावरणात झाली. नाथसंप्रदायाचे हजारो भक्त टाळ-मृदुंग, लेझीम व भगवे झेंडे घेऊन सहभागी झाले. जय गोरक्षनाथच्या जयघोषात परिसर दुमदुमला. २७ फेब्रुवारीपासून सुरू झालेली मिरवणूक २ मार्चपर्यंत विविध गावांतून प्रवास करून गडावर दाखल होणार आहे. २७ फेब्रुवारी ते ७ मार्चदरम्यान धार्मिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ४ ते ६ मार्चदरम्यान हरिकीर्तन सप्ताह होणार असून ७ मार्च रोजी महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते कलशपूजनाने सांगता होईल. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शंकर कदम व सचिव गोरक्षनाथ कदम यांनी नाथभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## कवाद परिवाराकडून बाबासाहेब कवाद पतसंस्थेला एअर बेड भेट

**निघोज** : बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने निघोज व परिसरातील २५ हॉस्पीटल बेड माध्यमातून गरजु व आजारी पेशंट साठी हॉस्पीटल बेडची सेवा पुरविण्याचा उपक्रम राबवित आहे. स्व. सुरेखा शांताराम कवाद यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त डॉ. विजय शांताराम कवाद यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमामध्ये आधुनिक सुविधा पेशंटला मिळावी या हेतुने त्यांनी संस्थेला ५ एअर बेड संस्थेचे चेअरमन वसंत कवाद यांचे कडे सपुर्त केले. डॉ. विजय कवाद यांनी सांगीतले की, या एअर बेड मुळे एका जागेवर असणाऱ्या पेशंटला हालचाल करण्यास मदत होऊन त्यांची प्रकृती सुधारण्यास मदत होईल. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर यांनी सांगीतले की संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या या बेड सुविधेचा निघोज, शिरूर परिसरातील पेशंटनी खुबा, मणका, हात-पाय, बायपास ऑपरेशन व पॅरलिसेस इत्यादी आजारावर १२७ पेशंटनी लाभ घेतला.

## राहुरी तालुक्यात मार्चपासून 'महाराजस्व समाधान शिबीर' अभियान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी मार्च ते मे २०२६ या कालावधीत राहुरी तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१' राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी दिली. तालुक्यातील आठ महसूल मंडळांत एकदिवसीय शिबिरे होणार असून ७ मार्च ताहाराबाद, १४ मार्च बारागाव नांदूर, २८ मार्च वांबोरी, १० एप्रिल टाकळीमियाँ, १७ एप्रिल सात्रळ, २४ एप्रिल ब्राम्हणी, ८ मे देवळाली प्रवरा आणि १५ मे राहुरी येथे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरांत भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ रूपांतरण, ७/१२ वितरण, जिवंत ७/१२ मोहीम, प्रलंबित फेरफार, अभिलेख दुरुस्ती, ई-मोजणी, पीएम किसान, सामाजिक अर्थसाहाय्य योजना, तक्रार निवारण आदी कामांचा निपटारा केला जाणार आहे. नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसील कार्यालयाने केले आहे.

# सतर्कतेमुळे सायबर फसवणूक टळू शकते

## डिजिटल अरेस्ट प्रकारांना घाबरू नये : पो. नि. सागर ढिकले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. मात्र नागरिकांच्या सतर्कतेमुळे हे प्रकार टळू शकतात, डिजिटल अरेस्ट ही संकल्पना कायद्यात अस्तित्वात नसल्याने अशा प्रकारांना घाबरू नये असे आवाहन सायबर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले. एचडीएफसी व सायबर पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी सायबर सुरक्षा आणि करिअर संधी याविषयी आयोजित विशेष कार्यशाळेत ढिकले बोलत होते.



कार्यशाळेत उपस्थित जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करतांना ढिकले म्हणाले की, स्मार्टफोन व सोशल मीडिया हे सायबर फसवणुकीचे मूळ आहे. त्यामुळे सोशल मीडिया हाताळताना अतिशय सतर्क रहावे. बँक, महावितरण, फोन पे, गुगल पे, मेझॉन, आर्मी किंवा इतर कोणत्याही संस्थेकडून बोलत असल्याची बतावणी करणाऱ्यांना आपल्या बँकेची, एटीएमची, क्रेडिट कार्डची माहिती किंवा ओटीपी देऊ नये. तसेच त्यांच्या सांगण्यावरून कोणतेही प डाऊनलोड करू नये. अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून किंवा क्यू आर कोड स्कॅन करू नये.

ओएलएक्स, फेसबुक, इंस्टाग्राम, क्विकर यासारख्या सोशल मीडिया साईट वरून अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करू नये, त्यांना पैसे पाठवू नये. शेअर मार्केटमध्ये गुंतवण्यासाठी लोभापोटी अनोळखी व्यक्तींना पैसे पाठवू नयेत. लोन प वरून लोन घेणे टाळावे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात फसवणुकीचे प्रकार वाढलेले आहेत. फेसबुक, इंस्टाग्राम, जीमेल, व्हाट्स ॲपमध्ये टू स्टेप वेरिफिकेशन ही सेटिंग करून आपले सोशल मीडिया अकाउंट हॅकिंग होण्यापासून वाचवता येऊ शकते.

याचबरोबर सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींच्या आलेल्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नयेत. आदी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना ढिकले यांनी यावेळी केल्या. सायबर फसवणूक कशाप्रकारे होते, याची अनेक उदाहरणे देऊन यापासून कसे वाचावे याबाबत मार्गदर्शन केले. यासंदर्भातील माहितीपत्रके सायबर पोलीस स्टेशनच्यावतीने उपस्थित जेष्ठ नागरिकांना वितरित करण्यात आली. याकरिता जेष्ठ नागरिकसौ सुलभा श्रीकृष्ण लांडगे यांचे सहकार्य लाभले. अनोळखी व्यक्तींच्या मागणीवरून कधीही ओटीपी शेअर करू नये.

सोशल मीडियावरील फसव्या जाहिरातींच्या मोहाला बळी पडू नये. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या क्रमांकावर संपर्क साधावा याचबरोबर आपल्या नजीकच्या पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवावी. तसेच https://cybercrime.gov.in या वेबसाईटवर जाऊन तात्काळ ऑनलाईन तक्रार नोंदवावी इत्यादी महत्त्वपूर्ण माहिती श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थितांना दिली. या कार्यशाळेदरम्यान जेष्ठ नागरिकांसाठी एचडीएफसीच्या इन्वेस्टमेंट प्रोडक्टची माहिती मुख्य शाखाधिकारी ओंकार कोकाटे, विस्तार अधिकारी पिराजी गुंजाळ, श्रीपाद पाठक यांनी उपस्थितांना दिली. यावेळी सायबर पोलीस स्टेशनचे अभिजीत अरकल, प्रशांत जाधव यांसह मोठ्या संख्येने विविध शासकीय खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## नगर तालुक्यात दहशतीचे सावट; कारवाई न झाल्यास रस्ता रोकोचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील नारायणडोह, चिचोंडी पाटील आणि निबोडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून सलग चोरी, दरोडे आणि जीवघेण्या हल्ल्यांच्या घटना घडत असून संपूर्ण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. रात्रीच्या वेळी ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले असून पोलिस यंत्रणेच्या कारवाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी संबंधित प्रकरणांची तात्काळ चौकशी करून आरोपींना अटक करावी व परिसरात कडक पोलीस बंदोबस्त लागू करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा नगर-जामखेड मार्गावर रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

२१ फेब्रुवारी रोजी नारायणडोह येथे शेतकरी पंढरीनाथ साठे यांच्या घरात घुसून अज्ञात चोरट्यांनी त्यांच्यावर वार करत ५ ते ६ तोळे सोन्याचे दागिने लुटले. चिचोंडी पाटील येथे वृद्ध दांपत्य सुदाम व पद्माबाई पवार यांना बांधून मारहाण करत रोख रक्कम व दागिने पळविण्यात आले. निबोडीतही एका कुटुंबावर हल्ला करून दागिने चोरीस गेले. सलग घटना घडूनही आरोपी मोकाट असल्याने ग्रामस्थांनी १० दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत कारवाई न झाल्यास नगर-जामखेड मार्गावर रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे यांनी दिला.

दरम्यान, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन देण्यात आले असून तातडीने कडक बंदोबस्त व आरोपींची अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## स्काऊटमुळे प्रगल्भ व्यक्तिमत्त्व घडते : शिक्षणाधिकारी गायकवाड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : स्काऊट-गाईड चळवळ ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी माध्यम असून त्यातून प्रगल्भ व्यक्तिमत्त्व घडते, असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी केले. हिरडगाव (ता. श्रीगोंदा) येथे आयोजित त्रिदिवसीय निसर्ग निवास शिबिराच्या महाशेकोटी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. रयत शिक्षण संस्था संचलित महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील अनिल भाऊराव पाटील पथकाचे शिबिर दि. २४ ते २६ फेब्रुवारीदरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिरडगाव येथे पार पडले. शिबिराचे आयोजन भारत स्काऊट आणि गाईड, अहिल्यानगर जिल्हा व ग्रामस्थ हिरडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. उद्घाटन माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या




हस्ते झाले. पहिल्या दिवशी बिनभांड्यांचा स्वयंपाक स्पर्धा, दुसऱ्या दिवशी प्रभातफेरी, शोभायात्रा व श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी स्काऊट म्हणजे बिनभिंतीची शाळा असे सांगत उपक्रमाचे कौतुक केले. महाशेकोटी कार्यक्रमात विविध सांस्कृतिक सादरीकरणे झाली. या शिबिराचे शिक्षण क्षेत्रातून व परिसरातून मोठ्या प्रमाणावर स्वागत करण्यात आले.

## विविध स्पर्धांमध्ये प्राईड अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे सुयश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : प्राईड इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या विद्यालयात स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. संस्थेच्या संस्थापक डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या दूरदृष्टीतून आणि माऊली प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक गुणवत्तेला नेहमीच प्राधान्य देण्यात येते. प्राचार्य प्रीती गोटे व उपप्राचार्य प्रदीप गोराणे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रभावी मार्गदर्शन दिले जाते. यंदा घेण्यात आलेल्या रंगोत्सव' आणि मेंटल मॅथ' या स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून घवघवीत यश मिळवले. या स्पर्धांसाठी शिक्षक आना लोखंडे, आरती कुटे व रूपाली सिन्नरकर यांनी विद्यार्थ्यांना परिश्रमपूर्वक प्रशिक्षण दिले.




या स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये समृद्धी धर्मराज कसबे, इशिता विराज तुपे, कैवल्य निखिल कासार, आईझा मोईद्दीन पटेल, पार्थ प्रशांत लिप्ते, सर्वज्ञ महेश जगताप, आराध्या धर्मराज कसबे, आराध्या विष्णू पवार, कैवल्य सचिन पटारे, दूर्वा दिगंबर पंडागळे, समृद्धी उदय कवडे आणि ज्ञानेश्वरी विजय शेरकर यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थापक, प्राचार्य, उपप्राचार्य तसेच सर्व शिक्षकवर्ग यांनी त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे परिसरात शाळेच्या शैक्षणिक कार्याची पुन्हा एकदा दखल घेतली जात असून, भविष्यातही अशाच गुणवंत विद्यार्थ्यांची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## अल्पवयीन मुलीला अमिष दाखवून पळवले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील मांढरेवाडी-येळपणे येथे अज्ञात इसमाने एका महिलेच्या अल्पवयीन मुलीला अमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली असून या प्रकरणी बेलवंडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सविता बाळासाहेब पवार (वय ४०, व्यवसाय शेती, रा. मांढरेवाडी-येळपणे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे २.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांच्या राहत्या घरातून घडली. अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या मुलीला काहीतरी अमिष दाखवून अज्ञात कारणासाठी फूस लावून तिचे कायदेशीर रखवालीतून अपहरण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक पवार हे करीत असून, प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू आहे. पोलीस प्रशासनाने घटनेचा तपास वेगाने सुरू केला असून परिसरात शांतता असल्याचे सांगण्यात आले आहे.

## दुपारी कडक ऊन तर रात्री बोचणारी थंडी; ताप, सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढले

**श्रीगोंदा** : मागील काही दिवसांपासून सतत होणाऱ्या हवामानातील बदलामुळे शहरात ताप व सर्दी खोकल्याचे रुग्ण वाढू लागले आहेत. दुपारी कडक ऊन तर रात्री बोचणारी थंडी.. अशा वातावरणामुळे अनेकांच्या प्रकृतीवर विपरित परिणाम होऊ लागला आहे. त्यात धुळीमुळे हवा प्रदूषणाची भर पडली आहे. त्यामुळे खासगी रुणालये, सरकारी दवाखान्यांमध्ये रुणांच्या रांगा वाढू लागल्या आहेत. श्रीगोंद्यात शहरी ग्रामीण भागात मागील काही दिवस वातावरणात सातत्याने बदल होताना दिसत आहेत. त्यामुळे आजारी होण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यात ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः डोकेदुखी, ताप, सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढले आहेत. सकाळी व सायंकाळी अचानक थंडी जाणवत आहे. दिवसा पडणाऱ्या कडक उन्हामुळे नागरिकांच्या शरीरातून घामाच्या धारा वाहात आहेत. तर, रात्रीच्या वेळी बोचरी थंडी जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांना एकाच दिवसात दोन ऋतू अनुभवायला मिळत आहेत. त्यातच शहरातील अनेक विभागांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामध्ये वाढलेले हे डास संध्याकाळच्या वेळी लोकवस्तीमध्ये घुसत असल्यामुळे डेंग्यू, मलेरियाची साथ पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. यामुळे दवाखाने, सरकारी रुग्णालयांमध्ये गर्दी वाढू लागली आहे. विशेषत्वाने रहिवासी भागांत संध्याकाळच्या वेळी डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

## पद्मश्री पॉलिटेक्निकची डीप लर्निंगच्या जोरावर लोणीची झेप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पॉलिटेक्निकच्या कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी विभागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय प्रोजेक्ट स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. विजय राठी यांनी दिली. मातोश्री इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निक, येवला येथे आयोजित टेक्नोफेअर या राज्यस्तरीय प्रोजेक्ट स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दारोडा प्रतिबंधक डीप लर्निंग आणि आयओटी वापरून दुकाने व बँकांचे संरक्षण करणारी प्रणाली हा




नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केला.

सार्वजनिक सुरक्षितता वाढवण्याच्या दृष्टीने डीप लर्निंग आणि आयओटी तंत्रज्ञानाचे प्रभावी एकत्रीकरण, तांत्रिक उत्कृष्टता आणि सर्जनशील मांडणी यांमुळे या प्रकल्पाला परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. विद्यार्थ्यांना प्रा. वसिम तांबोळी यांचे मार्गदर्शन लाभले. रुपेश हनुमंत आदक, विवेक अनिल लबडे आणि देवेंद्र शिरीष शेजुळ या विद्यार्थ्यांनी प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण करून संस्थेचा गौरव वाढवला.

# धर्मापेक्षा देश मोठा हीच सर्व धर्मग्रंथाची शिकवण

## रविशंकर विद्यामंदिरात सर्वधर्म समभाव रोजा इफ्तार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : जनसेवा हीच ईश्वर-अल्लाहची सेवा असून प्रत्येक धर्मात माणुसकी हीच शिकवण दिली असून प्रत्येकाचा आदर ठेवत आपले जीवन जगण्याचा रस्ता दाखवला आहे. रमजानचा रोजा, एकादशीचा उपवास भक्तीचा मार्ग आहे. मात्र देश धर्मापेक्षा कायम मोठा आहे. धर्म ग्रंथ वेगवेगळ्या भाषेत असले तरी त्यातील शिकवण एकच आहे ती म्हणजे एकमेकांना प्रेम, स्नेह देत प्रत्येक धर्माचा आदर करणे होय असे प्रतिपादन मौलाना आखलाक अहमद यांनी केले.



ते रविशंकर विद्यामंदिरात सर्वधर्म समभाव रमजान रोजा इफ्तार कार्यक्रमात बोलत होते. यावेळी हभप दयानंद महाराज कोरेगावकर, प्रवीण महाराज मुळे, संदीप महाराज तनपुरे, विद्यामंदिराचे प्रमुख कार्यवाहक नंदकुमार लांगोरे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी धोंडिबा मुळे, डॉ यशवंत लांगोरे, मुख्याध्यापिका सविता बळे, इल्लूभाई पठाण, तात्या क्षीरसागर आदी उपस्थित होते. यावेळी विद्यामंदिराच्यावतीने रोजा ठेवलेल्या विद्यार्थी रोजदारांसाठी खजूर आणि फळे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना हभप दयानंद महाराज कोरेगावकर म्हणाले की, सर्वधर्म समभाव हाच संदेश प्रत्येक धर्माने दिला आहे. आज रमजानचा रोजा आणि एकादशीचा दुग्धशर्करा योग आला असून तुम्ही विद्यार्थ्यांनी ठेवलेला रोजा निश्चित अखंड भारताचे उत्तम उदाहरण आहे. प्रेमाने जग जिंकता येते.

एकमेकांचा आदर करा. हाच संदेश गीता, कुराण आणि बायबलमध्ये दिला आहे. अंतर मनातील विष बाजूला केले तर निर्मात्याने जग खूप सुंदर बनवले आहे. त्याने कोणाशीच भेदभाव केला नाही. आणि हेच कटू सत्य आहे.

### मराठी भाषा गौरव दिनी मुलांनी घेतले सुंदर हस्ताक्षर उपक्रम

कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर उपक्रम हाती घेण्यात आला असून ज्यांचे हस्ताक्षरात बदल घडेल त्यांनी आपल्या स्व-इच्छेने विद्यालयास एक छान भेट द्यावी असा मानस व्यक्त केला. त्यास विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला.

### हिंदू विद्यार्थ्यांनी देखील ठेवला रोजा

१७ मुस्लिम विद्यार्थ्यांसह ६४ हिंदू धर्मीय विद्यार्थ्यांनी आणि १० शिक्षकांनी आणि संस्थेचे कार्यवाहक विद्यार्थ्यांचे लांगोरे नाना यांनी रमजानचा निरंक रोजा ठेवत विद्यामंदिरात भाईचाराचे उत्तम उदाहरण सर्वांसमोर ठेवले. पहाटे केलेली सहेरी संध्याकाळी या सर्वांनी नियोजित वेळेत आपला एक दिवसाचा रोजा पूर्ण केला.

संत कबीर यांचे दोहे, श्लोक आणि संस्कृत भाषेत उदाहरणे देत दयानंद महाराजांनी मुलांशी संवाद साधला. प्रास्ताविक करताना नंदकुमार लांगोरे म्हणाले की, विद्यामंदिराच्या विविध उपक्रमात सर्वधर्मीय विद्यार्थी सक्रिय सहभाग नोंदवून विविधेत एकता जपत असतात. त्याच पार्श्वभूमीवर आज विद्यार्थ्यांनी आपल्या मुस्लिम संवगड्यासाठी निरंक रमजानचा रोजा ठेवत सारे जहाँ से अच्छा हिंदुस्ता हमारा हा संदेश दिला.

सर्वच धर्मात माणुसकी हाच संदेश देण्यात आला असून भाईचारा जपण्यासाठी कायम पुढे यायला हवे. ज्यांनी रोजा ठेवला त्यांचे अभिनंदन म्हणत पालकांचे विशेष कौतुक केले.

द•ख•ल

## शेतकरी कन्यांचा सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे : संजय पवार

**वाघोली** : वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतींपेक्षा समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत फायनान्स ऑफिसर संजय पवार यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक समाजोपयोगी उपक्रम राबवून आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी भूमी फाउंडेशन अंतर्गत सुरू असलेल्या शेतकरी अनाथ व निराधार मुलींच्या निवासी प्रकल्पासाठी भव्य व सुसज्ज ग्रंथालय उभारून दिले. या ग्रंथालयासाठी आवश्यक असलेले उत्तम दर्जाचे फर्निचर, पुस्तकांसाठी रॅक तसेच इतर अत्यावश्यक साहित्य वस्तूरूपाने उपलब्ध करून देण्यात आले आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या या ग्रंथालयामुळे निवासी मुलींना अभ्यासासाठी स्वच्छ, सुंदर व प्रेरणादायी वातावरण मिळाले असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार आहे. ग्रामीण व गरजू शेतकरी कुटुंबातील मुलींसाठी हे ग्रंथालय अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. भूमी फाउंडेशनचे पदाधिकारी, कर्मचारी तसेच निवासी शेतकरी मुलींनी संजय पवार यांचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या या प्रेरणादायी उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचला असून इतरांनीही अशा सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्राईड अकॅडेमीत मराठी भाषा गौरव दिवस साजरा

**टाकळीभान** : मराठी भाषा गौरव दिवसानिमित्त शाळेत संस्काराची पाऊल उचलत विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्व समजून सांगण्यात आले. प्राईड अकॅडमी येथे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. डॉ.वंदनाताई मुरकुटे यांच्या संकल्पनेतून मराठी भाषा गौरव दिवस



हृदयस्पर्शी वातावरणात साजरा करण्यात आला. आजच्या आधुनिक काळात इंग्रजी बरोबरच आपली मातृभाषा मराठी हिचे महत्व विद्यार्थ्यांना समजावे, प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या मातृभाषेचा अभिमान असावा, नवीन पिढीला मराठी भाषा चा समृद्ध वारसा जपता यावा व कुसुमग्रजांच्या महाना स्मृतींना उजाळा देऊन मराठी भाषेचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत अभिमानाने पोहचवावा, ही या दिवसाची मुख्य उद्दिष्टे आहेत. याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.प्रा. प्रीती गोटे यांनी प्रास्ताविक केले.शाळेचे उपप्राचार्य प्रदीप गोराणे यांनी आभार मानले.

## मांगिरबाबा यात्रेला सोमवारपासून सुरुवात

**घोडेगाव**, येथील सर्वधर्मीयांचे जागृत देवस्थान असलेल्या मांगिरबाबा देवाच्या यात्रेला सोमवार, दि. २ मार्च २०२६ पासून प्रारंभ होत असून तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सव रंगणार आहे. सोमवारी सकाळी १० वाजता मारुती मंदिर येथे रांगोळी स्पर्धा, तर सायंकाळी ६ वाजता नृत्य स्पर्धा होणार आहे. स्पर्धांतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके देण्यात येणार असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन यात्रा समितीने केले आहे. मंगळवारी पहाटे ५ वाजता कावडी मिरवणूक, सकाळी ९ वाजता मांगिरबाबांना नैवेद्य व घोडेश्वरी देवीला चोळी-पातळ अर्पण करण्यात येणार आहे. रात्री भव्य छबिना व शोभेचे दारूकाम होईल. तसेच जय सद्गुरु ब्रास बँड, श्री सद्गुरु ब्रास बँड, उस्मान शहा ब्रास बँड व नाद हलगी (निरा) यांची बँड जुगलबंदी हे विशेष आकर्षण ठरणार आहे. बुधवारी रात्री ९ वाजता मार्केट यार्ड (कांदा मार्केट) येथे कै. तुकाराम खेडकर व पांडुरंग मुळे (मांजरवाडीकर) यांचा लोकनाट्य तमाशाचा मोफत कार्यक्रम होणार आहे.

## शालेय बस विशेष तपासणी मोहिमेत १५ वाहनांवर कारवाई..!

**बारामती** : उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शालेय बस विशेष तपासणी मोहिमेत बारामती, दौंड, इंदापूर तालुक्यातील ७७ शालेय बसेस तपासणी करुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी १५ वाहनावर कारवाई करुन ६७ हजार ५०० रुपये दंडात्मक रक्कम



वसूल करण्यात आली आहे. या मोहिमेत योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयुसी) तसेच मुदत संपलेल्या इतर कागदपत्रे व रस्ते सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या दोषी शालेय बसेसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच मोटार वाहन निरीक्षक यांनी शाळांना भेटी देऊन शालेय बसेसच्या विधिग्राह्य नसलेल्या कागदपत्रांचे नुतनीकरण करणे, शालेय बस नियमावलीचे पालन करणे, रस्ता सुरक्षा वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत संबंधित शाळा व्यवस्थापक व वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे पालक आणि अन्य नागरिकांकडून केलेल्या मागणी विचारात घेता तपासणी मोहीम आयोजित करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्यानंतरही यापुढेही विशेष तपासणी मोहिम सुरुच राहणार आहे. सर्व शालेय बस आणि इतर वाहनचालकांनी आपल्या वाहनांची सर्व कागदपत्रे अद्यावत करून घ्यावीत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले आहे.

# स्वच्छ, सुंदर, हरित बारामतीसाठी महास्वच्छता अभियानाचा शुभारंभ

## वहिनींच्या नेतृत्वात स्वच्छतेचा निर्धार अधिक दृढ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती** : बारामतीची स्वच्छता ही केवळ मोहीम नसून दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी जपलेली एक जिवंत भावना आहे. स्वच्छ, सुंदर आणि हरित बारामती हा दादांचा केवळ संकल्प नव्हता, तर बारामतीवरील त्यांच्या अपार प्रेमाचा तो अमूल्य वारसा आहे. आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही त्याच विचारांना कृतीची जोड देत, स्वच्छतेच्या माध्यमातून बारामतीच्या विकासाची परंपरा अधिक बळकट करण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला आहे. बारामती नगर परिषदेच्या वतीने दर शुक्रवारी राबविण्यात येणाऱ्या महास्वच्छता अभियानाची



सुरुवात (दि:२७) रोजी सकाळी विद्या प्रतिष्ठान येथे अजितदादा पवार यांच्या समाधीस्थळी अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर रुई गावठाण येथे श्रमदानाने स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम म्हणजे दादांच्या स्वच्छ, सुंदर, हरित बारामतीच्या स्वप्नाला दिलेली खरी मानवंदना ठरली. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, मुख्याधिकारी पंकज भुसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण इंगळे, आरोग्य सभापती नवनाथ बल्लाळ, स्थानिक नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर, नगरसेवक विष्णुपंत चौधर, अमोल कावळे, अल्ताप सय्यद, विशाल हिंगणे, प्रवीण माने, गणेश जोजारे, अनुप्रिता तांबे, प्रा.अजिनाथ चौधर, युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, आरोग्य अधिकारी यशराज बनसोडे, आरोग्य निरीक्षक स्वरूप अहीवळे, अजय लालबिगे, विजय खरात, पांडुरंग चौधर, मच्छिंद्र चौधर, प्रमोद कांबळे, नवनाथ चौधर, पत्रकार सुरज देवकाते आणि नगरपरिषद कर्मचारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या सूचनेनुसार हा महास्वच्छता उपक्रम नियमितपणे राबविण्यात येणार असून, शहर स्वच्छतेबाबत प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येत जबाबदारी पार पाडण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. दादांचे स्वप्न, वहिनींचा निर्धार आणि बारामतीकरांचा उत्स्फूर्त सहभाग या बळावर स्वच्छ, सुंदर, हरित बारामतीचा प्रवास अखंड सुरू राहणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> **स्वच्छता ही दादांनी दिलेली संस्कृती आहे. महास्वच्छता अभियानाच्या माध्यमातून बारामती अधिक स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येत सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. हा उपक्रम दादांच्या स्वप्नपूर्तीकडे नेणारा महत्त्वाचा टप्पा आहे.**
>
> **सचिन सातव**
> **(नगराध्यक्ष, बारामती नगर परिषद)**

> **स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. महास्वच्छता अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करून स्वच्छ, निरोगी आणि सुंदर बारामती घडविण्याचा आमचा प्रयत्न आहे.**
>
> **नवनाथ बल्लाळ**
> **(आरोग्य सभापती, बारामती नगर परिषद)**

## यांत्रिक सायकल दिव्यांगांच्या जीवनाला सकारात्मक दिशा देते : वाघ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : अपंग सामाजिक विकास संस्था शहर आणि तालुक्यातील दिव्यांग बांधवांना आपल्या आयुष्यात व्यावसायिकपणा यावा याकरिता व त्याला चालना मिळण्याकरिता सातत्यपूर्ण आणि सतत प्रयत्नशील असतात. मी स्वतः दिव्यांग तक्रार निवारण अधिकारी संजय साळवे यांच्याकडे स्वप्निल बडाख या दिव्यांग व्यक्ती साठी तीन चाकी सायकलची मागणी केली होती.त्यांनी त्याला बॅटरीवरील सायकल देऊन त्याच्या जीवनात सकारात्मक दिशा देण्यासाठी व व्यवसायाला चालना मिळण्यासाठी विशेष प्रयत्न केले हे नक्कीच कौतुकास्पद आहे.

यांत्रिक सायकल दिव्यांगाच्या जीवनाला



सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न करेल असे प्रतिपादन श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंद कुमार वाघ यांनी बॅटरीवरील सायकल प्रदान कार्यक्रम प्रसंगी केले.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र,प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र, अहिल्यानगर,अपंग सामाजिक विकास संस्था श्रीरामपूर, आसान दिव्यांग संघटना महाराष्ट्र आणि दिव्यांग मार्गदर्शन व पुनर्वसनकेंद्र मूकबधिर विद्यालय श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मालुंजा येथील रहिवाशी स्वप्निल बडाख या दिव्यांग व्यक्तीला बॅटरीवरील सायकल प्रदान कार्यक्रम श्रीरामपूर तहसील कार्यालय या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.

## अजमेळा दिंडीचे कार्य कौतुकास्पद : खरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : माऊलींच्या पायी वारी सोहळ्यातील व आंबेगाव तालुक्यातील आदर्श गाव गावडेवाडी येथील अजमेळा दिंडी क्रमांक २६ चे कार्य अतिशय कौतुकास्पद असून या दिंडीची व संयोजकांची प्रेरणा इतरांनी घ्यावी असेच त्यांचे काम आहे. असे प्रतिपादन मोहोळ तालुक्याचे आमदार राजेंद्र खरे यांच्या पत्नी तृप्तीताई राजेंद्र खरे यांनी पंढरपूर येथे केले.

माऊलीच्या पायी वारी सोहळ्यातील अजामेळा दिंडी क्रमांक २६ च्यावतीने पंढरपूर येथील अष्टकोटी ब्रम्हांडनायक पांडुरंग परमात्म्याच्या मंदिरात गुरुवार (ता. १९ ) फेब्रुवारी ते गुरुवार (ता.२६)फेब्रुवारी असा सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह संपन्न झाला. या सप्ताहाला मोहोळ तालुक्याचे (जि. सोलापूर ) विद्यमान आ. राजेंद्र खरे यांच्या पत्नी तृप्तीताई राजेंद्र खरे यांनी आपल्या सहकारी महिला व सहकाऱ्यांसह भेट दिली यावेळी वारकऱ्यांना व सप्ताहाला शुभेच्छा देताना तृप्तीताई राजेंद्र खरे बोलत होत्या. यावेळी सप्ताहाचे संयोजक ह-भ-प पत्रकार मधुकर महाराज गायकवाड, सविता मधुकर महाराज गायकवाड दिंडीचे चोपदार ह भ प मधुकर महाराज साळवे, मुरलीधर महाराज शिंदे, हभप अर्जुन महाराज पंचरास ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे व्यासपीठ चालक नेवासे गणेश वाडी (ता. नेवासा) येथील हभप श्रीकांत महाराज बेल्हेकरअजमेळा दिंडी क्रमांक २६ चे उपाध्यक्ष बबनराव राजगुरू, हभप भाऊसाहेब लोंढे, हभप रामा लोंढे, कौसाबाई नागू टाव्हरे वंदनाताई चव्हाण, संजीवनीताई मंडलिक, लक्ष्मी मुरलीधर शिंदे, हभप सुशीला टेमकर आदी वारकरी व भावीक मोठ्या संख्येनेउपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना तृप्ती ताई खरे म्हणाल्या महाराष्ट्रात गावोगावी अखंड हरिनाम सप्ताह होतात हे सप्ताह सर्व गाव मिळून करत असतात मात्र आजामेळा दिंडी आंबेगाव तालुक्यातून येऊन पांडुरंग परमात्म्याच्या मंदिरात सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह करतात हे अतिशय अवघड आहे परंतु ते हे कार्य पार पाडत आहेत.

## मराठी भाषा जपणे आपले कर्तव्य आहे : ॲड. सुरेखा टेमक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो . त्याचे औचित्य साधून गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चे संस्थापक अध्यक्ष ऍड.भाऊसाहेब टेमक साहेब व ऍड. सुरेखा टेमक मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली मराठी राजभाषा दिवस साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापिका ॲड. सुरेखा टेमक होत्या. तर प्राचार्या भारती कुदळे व्यासपीठावर उपस्थित होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना त्या म्हणाल्या की मराठी भाषा हि आपली मातृभाषा आहे, ती जपने आपले कर्तव्य आहे, आपण च आपल्या भाषेला मान सन्मान दिला पाहिजेल. पवन घोगरे यांनी आपल्या शैलीमध्ये मराठी भाषा बद्दल महत्व सांगितले. महेश शिंदे यांनी कविता सादर केली. मराठी दिनानिमित्त मराठी ओलंपियाड परीक्षा आयोजित करण्यात आली होती. त्या परीक्षेमध्ये शाळेतील इयत्ता नववीत शिकणारे सपना रणनवरे हिला ट्रॉफी व मेडल मिळाले तर आरती बोडखे, मनस्वी गटकळ, श्रुतिका लोखंडे, स्वरा बोरुडे, उघडे स्वरा या विद्यार्थ्यांना मेडल मिळाले. तर मराठी च्या भाषेच्या शिक्षिका ज्योती कोलते यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला . सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षक यांना पारितोषिक वितरित करण्यात आले.

## शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांची गय करू नका

### बोगस खत विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करा : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री


**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यात कृषी सेवा केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बोगस खतांची विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या पार्श्वभूमीवर आ. आशुतोष काळे यांनी आक्रमक भूमिका घेतली असून शेतकऱ्यांच्या कष्टाशी खेळणाऱ्या कुणाचीही गय करू नका दोषी कृषी सेवा केंद्र आणि खत कंपन्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना आ. आशुतोष काळे यांनी तालुका कृषी अधिकारी यांना दिल्या आहे. गेल्या महिनाभरापासून कोपरगाव तालुक्यात कृषी विभागाच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने मोठी मोहीम राबवली आहे. या मोहिमेत तालुक्यातील तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून सुमारे १५ लाख रुपये किमतीचे ५१ मेट्रिक टन बोगस खत जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी संबंधित कृषी सेवा केंद्र चालकांसह खत निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आ. आशुतोष काळे यांनी कृषी विभागाच्या या कारवाईचे समर्थन करतानाच सूचना केल्या आहेत की केवळ काही ठिकाणी कारवाई करून थांबू नका. तालुक्यातील सर्व संशयास्पद खत साठ्यांची तपासणी करा आणि जिथे कुठे बनावट खत आढळेल तिथे कडक कायदेशीर कारवाई करा. यावेळी आ. आशुतोष काळे यांनी शेतकऱ्यांना हि आवाहन केले आहे कि, खते खरेदी करताना पक्के बिल आणि तडताळणी करूनच खते खरेदी करा. कुठेही बोगस खत आढळल्यास त्वरित कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क करा जेणे करून भविष्यात कोणत्याही कंपनीचे शेतकऱ्यांना फसवण्याचे धाडस होणार नाही.

## हरणी विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे** : हरणी माध्यमिक विद्यालय हरणी येथे आज राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय सासवड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

या शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. अशोक गिरी उपस्थित होते. तसेच डॉ. कीर्ती गोसावी, फार्मासिस्ट महादेवी राऊत व परिचारिका सीमा खैरे यांनी विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी केली. विद्यार्थ्यांची उंची, वजन, दृष्टी, दात व सर्वसाधारण शारीरिक तपासणी करण्यात आली. आवश्यक तेथे पुढील उपचार व मार्गदर्शनाबाबत सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, संतुलित आहार व नियमित व्यायाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक पिसाळ



सतीश तुकाराम यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून विद्यालयाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. सदर प्रसंगी विद्यालयाचे उपशिक्षक जगताप आर. व्ही. तसेच पठारे बी. एम., जामदार जी. बी.तसेच उपशिक्षिका सनाकाडे ए. आर. तसेच कदम एस. टी. उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी जगताप विजय व श्री.जगताप श्रीकांत यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी जगताप डी. के. यांनी उपस्थितांचे आभार मानले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून, गरजू विद्यार्थ्यांना पुढील वैद्यकीय सल्ल्यासाठी मार्गदर्शन देण्यात आले. विद्यालय प्रशासन, शिक्षकवर्ग व पालकांनी या उपक्रमाचे स्वागत केले.


**जाहिर नोटीस**

महाड येथील तहसिलदार अधिकारी सो.यांचे कोर्टात
१) श्रीम. आनंदीबाई गणपत पालांडे, वगैरे
वि - अपिलार्थी
१) श्री. गोविंद कृष्णा पालांडे, वगैरे - उत्तरार्थी
१/१ वंदना गोविंद पालांडे वयःसज्ञान, धदांः गृहिणी
१/३ संज्योती संजय सावंत वयःसज्ञान, धदांः गृहिणी
१/४ आरती सतिश शिंदे वयःसज्ञान, धदांः गृहिणी
सर्व रा.ए-२०१, कस्पती वस्ती, निसर्ग सिटी २, को.ऑप.हौसिंग सोसा., वाकड, पुणे-४११०५७ आणि रा.राजपार्क, फेज २, बि १५, फ्लॅट नं.३बी, काकडे पार्क जवळ, केशव नगर, शनी मंदिर समोर, चिंचवड, पुणे-४११०३३
सदरकामी सर्व संबंधीत लोकांस कळविण्यात येते की अपिलार्थी यांनी वरील मे न्यायालयात आर.टी.एस.नं. ५७/२०२५ या अपिल दाखल केलेला आहे.
सदर अपिलाचेकामी तुम्ही उत्तरार्थी नं.१/१ ते १/४ आहात. आपणास आपल्या पत्यावर नोटीस काढली असता, आपणास नोटीसीची बजावणी होत नाही. आपला दुसरा पत्ताही अपिलार्थी यांस मिळून येत नाही. आपण अपिलाची नोटीस घेण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे आपणास सदर जाहीर नोटीसद्वारे नोटीसीची बजावणी करण्यात येत आहे.
तरी आपणास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलाची सुनावणीची पुढील तारीख १८/०३/२०२६ रोजी वरील मे. न्यायालयात सुनावणीसाठी ठेवण्यात आली असून तुम्ही स्वतः अगर तुमच्या प्रतिनीधी, वकिलांमार्फत हजर राहून तूमचे लेखी म्हणणे सादर करावे अन्यथा तुम्हास सदर अपिलाचेकामी काहीएक सांगायचे नाही, असे समजून तुमचे विरुद्ध पुढील आदेश पारित केले जातील. याची कृपया नोंद घ्यावी.
सदर जाहीर नोटीस ता २०/०२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली
ठिकाणः महाड (शिक्का) मा. तहसिलदार सो.
दिनांक : २०/०२/२०२६ ता. महाड, जि.रायगड


## सरकारने शेतकऱ्यांना कर्जाच्या जोखडातून मुक्त करावे : बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर,**: शेतकरी अडचणीत असताना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही सरकारची जबाबदारी असून, कर्जमाफी करून शेतकऱ्यांना कर्जाच्या जोखडातून मुक्त करावे, अशी मागणी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना यांच्या गळीत हंगाम सांगता समारंभानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, अमेरिकेसोबत झालेल्या करारांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीती व चिंतेचे वातावरण आहे. या करारांचा फेरविचार करणे गरजेचे आहे. आगामी अर्थसंकल्पात कर्जमाफीचा समावेश व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. देशातील आर्थिक ताणाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत असून कांद्याला योग्य बाजारभाव मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सरकार शेतकऱ्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. पुणे-नाशिक रेल्वेमार्गाबाबत संगमनेरवरून जाणाऱ्या मूळ आराखड्यालाच मान्यता द्यावी, अशी मागणी करत विकासकामात अडथळे आणू नयेत, असेही थोरात यांनी स्पष्ट केले.

## नगरपालिकेच्या शाळांतून मराठी भाषा गौरव दिना निमित्त साहित्य जागर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे** : कवी कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा दिवस म्हणुन साजरी होत असताना सासवड येथील मराठी साहित्य परिषद व नगरपालिकेच्या सर्व शाळांमधून विविध उपक्रम राबवत मराठी भाषेचा जागर करण्यात आला. येथील इंदिरा गांधी विद्यालय (शाळा क्रमांक चार) येथे मराठी विषयाच्या अभ्यासक, सेवानिवृत्त शिक्षिका स्नेहल देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांचे राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, प्रतिज्ञा, संविधान वाचन, साने गुरुजी यांची प्रार्थना व मराठी भाषेविषयक घोषणा देत काढलेली प्रभात फेरी, शर्वरी कोकरे, पूर्वा गरुड, अन्वी जाधव या विद्यार्थ्यांची मनोगते व सर्वांचे सामुहिक कविता वाचन विशेष लक्षवेधी ठरले. आज एकादशी असल्याने मुलांची प्रभात फेरी श्री संत सोपानदेव महाराज यांच्या प्रांगणात जाऊन आल्याने या उपक्रमाला अध्यात्माची देखील जोड




मिळाली. अध्यक्षीय भाषणात स्नेहल देशपांडे यांनी कुसुमाग्रज यांच्या बालपणापासून ते त्यांनी स्थापन केलेले ध्रुव मंडळ व त्यांची एकूण साहित्य संपदा या विषयी मौलिक माहिती देत मुलांशी संवाद साधला त्यांनी गाणे, कविता, गोष्ट सादर करून मुलांनी वाचनाचा व्यासंग वाढवावा असे आवाहन केले. साहित्य परिषदेच्या वतीने हेमंत ताकवले यांनी प्रास्तविक केले. सासवड येथील पालिकांच्या सर्व शाळांना नटसम्राट व विशाखा ही पुस्तके साहित्य परिषदेच्या वतीने भेट देण्यात आल्याची माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी दिली. शाळेच्या मुखाध्यापिका अनुराधा राम दहिवाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर शिवाजी राजीवडे यांनी सूत्रसंचालन केले माजी नगराध्यक्षा कलाताई फडतरे, राष्ट्रपती पदक विजेते शिक्षक कुंडलिक मेमाणे, मनोहर कामठे, मोहन चव्हाण, शहर पत्रकार संघाचे बाळासाहेब कुलकर्णी, सुधीर गुरव, जीवन कड, जगदीश शिंदे आदि मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. दत्तात्रय खेडेकर, नारायण चौधरी स्वाती देवकर, वर्षाराणी शिर्के, नीलम जाधव या शिक्षक वृंदांनी कार्यक्रमाचे देखणे आयोजन केले.

# बारामती नगर परिषद अर्थसंकल्प सन २०२६ - २०२७ सादर..!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती** :बारामती नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये बारामती नगरपरिषद सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प (दि :२६) रोजी सादर करण्यात आला. सन २०२६-२७ करिता एकूण एकंदर जमा रू. ५५१,८२,५५,०७०, एकूण एकंदरीत खर्च रू. ५५१,७३,८०,००० वजा जाता ८,७५,०७० रू. चा शिलकीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला.सदर अर्थसंकल्पामध्ये बारामती शहराच्या पायाभूत सुविधा, नागरी सुविधा, पर्यावरण विकास, आरोग्य व स्वच्छता, सामाजिक सुविधा याकरिता भरीव तरतूद करून आर्थिक शिस्त व पारदर्शकता, सर्वसमावेशक कल्याण व शाश्वत विकासाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. जमा खर्चाचा तपशील खालील प्रमाणे ;एकूण महसुली जमा १५१,२८,५०,०००, एकूण भांडवली जमा १८५,४२,२०,०००, एकुण जमा ३३६,७०,७०,००० , १ एप्रिल २०२६ ची आरंभीची अपेक्षित शिल्लक २१५,११,८५,०७०, शिल्लकेसह एकुण एकंदर जमा ५५१,८२,५५,०७० , खर्च एकूण महसुली खर्च १५४,९४,८०,००० एकूण भांडवली खर्च ३९६,७९,००,००० एकुण खर्च ५५१,७३,८०,०००, (दि.३१) मार्च २०२७ ची अखेरची अंदाजकीय शिल्लक ८,७५,०७०

> **नगरपालिकेचे जेसीबी तीन महिन्यापासून बंद अवस्थेत आहेत. ते दुरुस्त न करता दुसरीकडून जेसीबी भाडेतत्वावर घेतले जातात आणि त्याला महिन्याला अंदाजे दहा लाख रुपये भाडे देतात. बारामती नगर परिषदेचे जेसीबी असताना भाडेतत्त्वावर घेण्याची गरज का..? भाडेतत्त्वावर जेसीबी घेऊन याचा मलिदा कोण खातोय.**
>
> **अभिजीत जाधव (नगरसेवक बा.न.प )**

**नाविन्यपूर्ण योजना** ; स्पर्धा परीक्षा व भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी प्रोत्साहनपर उपक्रम- एकत्रित ८० लाख तरतूद, सफाई कामगारांसाठी कल्याणकारी योजना आरोग्य / अपघात विमा - १० लाख, नगरपरिषद कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा सुविधा - ४० लाख, महिला सबलीकरणासाठी ५ टक्के तरतुद व झझझ (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) तत्त्वावर नाविन्यपूर्ण उपक्रम १ कोटी २५ लाख, मागासवर्गीय सुधारणा ( ५% तरतूद - १ कोटी २५ लाख) मधून मागासवर्गीय महिलांसाठी हेल्थ कार्ड सुविधा, दिव्यांग कल्याणासाठी ( ५% तरतूद - १. २५ कोटी) मधून मासिक १००० रू. अर्थसाहाय्य,गुणवंत खेळाडूंना आर्थिक प्रोत्साहन (क्रीडा विकास २.५% तरतूद), उद्यान विकास- १० कोटी तरतूद हरित उपक्रमांना मालमत्ताकरामध्ये कर सवलत- १ कोटी तरतूद, महिलांसाठी स्वतंत्र (झळपझ ) शौचालय करिता भांडवली तरतूद ५ कोटी अर्थसंकल्पाच्या



विविध बाबींवर सभागृहात सखोल चर्चा झाली. सदस्यांच्या सूचना विचारात घेऊन आवश्यक बदल करण्याचे खात्री देऊन अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. या प्रसंगी नगराध्यक्ष सचिन सातव, मुख्याधिकारी पंकज भुसे, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, गटनेते संजय संगवी, उपगटनेते संपदा चौधर, आरोग्य सभापती, बांधकाम सभापती तसेच सर्व नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते.

# पकडलेला डंपर पळवताना पलटला

## खनिज तस्करांच्या झटापटीत महसूल कर्मचारी जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव तहसीलदारांच्या गौण खनिज प्रतिबंधक पथकाने तालुक्यातील आपेगाव येथे अवैध मुरुमाची वाहतूक करणारा डंपर पकडला. तो कारवाईसाठी शेवगाव येथे नेत असताना डंपर मालक व चालकांनी झटापट करीत डंपर पळवून नेण्याचा प्रयत्न केला असताना डंपर पलटी झाला. या अपघातात महसूल पथकातील महसूल सेवक गंभीर जखमी झाले आहे.

याबाबत माहिती अशी की, शेवगाव तालुक्यातील पश्चिम भागातील ढोरा नदी पात्रातून वाळू व परिसरातून मोठ्या प्रमाणावर अवैध मुरूम तस्करी सुरू असून खुलेआम चाललेल्या या प्रकाराला आळा घालण्यासाठी शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार राजेंद्र बकरे, ग्राम महसूल अधिकारी राजेश राठोड, सोमनाथ आमने, मनोहर कर्डिले, व महसूल सेवक सोमनाथ साबळे यांची गौण खनिज प्रतिबंधक पथक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

२६ फेब्रुवारी रोजी हे पथक अमरापूर मार्गे खाजगी वाहनाने आव्हाने, वडुले खुर्द आखतवाडे आपेगाव ढोरजळगाव येथे गस्त घालीत ढोरजळगाव शेवगाव कडे येत होते आपेगाव येथील शेळके वस्तीजवळ आले असताना शेवगाव- मिरी रोडवर विना क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा डंपर येताना दिसला.

पथकाने चालकाला थांबण्याचा इशारा केला तरी चालकाने न थांबता डंपर पुढे नेला. डंपरचा पाठलाग करून पथकाने डंपर अडवून पाहणी केली असता. डंपर मध्ये मुरूम आढळून आला यावेळी चालकास मुरूम वाहतुकीबाबत व रॉयल्टी बाबत विचारपूस केली असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितले. अन् फोनवरून डंपर मालकाला तेथे बोलावून घेतले. तहसीलदारांच्या आदेशाने आम्ही गौण खनिजावर कायदेशीर कारवाई करत आहोत असे सांगून डंपर कारवाईसाठी शेवगावला घेऊन जात आहोत. असे सांगत महसूल सेवक सोमनाथ साबळे यांना डंपर मध्ये बसवले. मात्र डंपर मालकाचा मुलगा शुभम संजय उगले याने चालकाच्या सीटवर बसून डंपर भर वेगात चालवून तो आपेगाव ते आव्हाने जाणाऱ्या रस्त्यावर चालू गाडीत ट्रॉलीवर करून सर्व रस्त्यावर मुरूम टाकून दिला व महसूल सेवक साबळे यांना मारहाण करीत डंपर पलटी करून तुला ठार मारतो अशी धमकी दिली. अचानक आव्हाने दिशेने डंपर वेगात वळवला असता डंपर पलटी होऊन साबळे यांना डोक्याला गंभीर इजा झाली. मागून वाहनातून पथक येईपर्यंत चालक व मालकाचा मुलगा शुभम उगले हे दोघे डंपर सोडून अंधारात पळून गेले.

पथकातील कर्मचाऱ्यांनी साबळे यांना बाहेर काढून त्यांना शेवगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. सदर घटनेची माहिती मिळताच तहसीलदार आकाश दहाडदे यांनी पोलीस पथकासहित या ठिकाणी धाव घेत. डंपर जेसीबीच्या साह्याने कारवाई करिता शेवगाव येथे जमा केला. महसूल सेवक सोमनाथ सर्जेराव साबळे ( खरडगाव) यांच्या फिर्यादीवरून आरोपी संजय रंगनाथ उगले, शुभम संजय उगले व चालक( नाव माहीत नाही) ( रा.आखतवाडे ता.शेवगाव), यांच्याविरुद्ध शेवगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक अशोक काटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा तपास सुरू आहे.



# मंदीर परिसरात विनाकारण व्यक्ती फिरताच कसे?

## संरक्षण अधिकाऱ्याला विचारला जाब; अभय शेळके आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : साई मंदिर परिसरात काही काम नसताना टाईम पास म्हणून फिरणाऱ्या व्यक्ती फिरताना निदर्शनास आल्याने शिर्डी चे उपनगराध्यक्ष अभय शेळके चांगलेच संतापले असून त्यांनी थेट संरक्षण अधिकारी पि एस आय रोहीदास माळी यांना जाब विचारत असे बिनकामाचे लोक मंदीर परिसरात फिरतातच कसे असा सवाल विचारत माळी यांना धारेवर धरल्याने संरक्षण विभागाच्या कामगिरीवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे .

सुरक्षा यंत्रेणेची ज्यांचेवर जबाबदारी आहे तेच जर यावर डोळेझाक पणा करत असेल तर साई भक्तांना मंदीर परिसरात फिरताना व्यत्यय येत असेल तर मग संरक्षण विभाग नेमका करतो तरी काय? असा सवाल त्यांनी व्यक्त करत संरक्षण विभागाच्या कारभारावर तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शिर्डीत दररोज जगभरातून हजारो साईभक्त साई समाधीचे दर्शन घेण्यासाठी येतात. त्यांचा शहरात प्रवेश होताच परराज्यातील तरुण किंवा व्यसनाधीन व्यक्ती त्यांच्या वाहनांचा पाठलाग करून त्यांना हॉटेल किंवा लॉजिंग घेण्यासाठी



व बळजबरीने ठराविक प्रसाद दुकानात फुलहार किंवा इतर वस्तू घेण्यासाठी त्रास देतात.

या व्यतिरिक्त मंदिर परिसरात अनेक अनोळखी तरुण विनाकारण फिरताना दिसतात. त्यामुळे शिर्डीत साई दर्शनासाठी आलेल्या भाविकांना शांतपणे दुकानात वस्तू घेण्यासाठी जाता येत नाही. परिणामी मंदिर परिसरात भाविकांना साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर किंवा घेण्याआधी फेरीवाले विविध प्रकारच्या वस्तू विकणाऱ्यांपासून मोठा मनःस्ताप होतो.

भाविकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच त्यांची सुरक्षेची जबाबदारी संरक्षण विभागाची आहे. उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी स्वतः मंदिर परिसरात फिरून याचा आढावा घेतला. विनाकारण फिरणाऱ्या व्यक्ती विरोधात धडक मोहीम राबवून त्यांना समज देण्यात यावी मंदीर परिसराचे पावित्र्य राखले जावे यासाठी संरक्षण विभागाने ठोस पावले उचलावीत अशा सुचना शेळके यांनी दिल्या आहेत. दरम्यान शेळके यांच्या आक्रमकतेमुळे

संरक्षण विभाग काय धडा घेते हे पुढील काळात पहाणे औचित्याचे ठरणार आहे.

# संजीवनीच्या विद्यार्थ्यांची किर्लोस्कर न्यूमॅटिकमध्ये निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगांव**: येथील संजीवनी इंजिनीअरिंग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण व नियोजनबद्ध प्रयत्नांना पुन्हा एकदा यशाची सुवर्णमुद्रा मिळाली आहे. मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातील आठ होतकरू विद्यार्थ्यांची त्यांचा अंतिम निकाल जाहीर होण्यापूर्वीच किर्लोस्कर न्यूमॅटीक, पुणे या देशातील नामांकित औद्योगिक कंपनीत नोकरीसाठी निवड झाली आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला, प्रात्यक्षिक कौशल्यांना आणि उद्योगाभिमुख शिक्षणपद्धतीला मोठी दाद मिळाली आहे, अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने दिली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रणव दिनकरपूरी गोसावी, अभिषेक भाऊसाहेब गुजर, ऋद्राक्ष विलास माकुणे, तेजस संजय निकम, संकेत संजय निरगुडे, प्रतिक्षा राधाक्रिष्ण सानप, साईराम जनार्दन जावळे व उमेश गोरख चौधरी यांचा समावेश आहे. एकामागून एक नामांकित कंपन्या संजीवनीच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या सुवर्णसंधी देत असल्याने महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा ठसा अधिक ठळक होत आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आकर्षक वेतनाच्या व प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध करून देणारे संजीवनी कॉलेज हे शाश्वत, विश्वासार्ह आणि उद्योगाभिमुख शिक्षण देणारे अग्रगण्य महाविद्यालय म्हणून उदयास आले आहे. पालकांनी टाकलेला विश्वास आणि विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द यांचे हे यशस्वी फलित ठरत असून संजीवनीची प्रगतीची वाटचाल अधिक भक्कम होत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे.

# निर्मल ब्राईट स्कूलमध्ये मराठी भाषा दिन साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : निर्मल ब्राईट फ्युचर स्कूल शेवगांव येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार, मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता व चारोळ्या सादर केल्या. इयत्ता पाचवी ते नववीच्या



विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषेचा गौरव, तिची समृद्ध परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांविषयी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतांतून विचार व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य दत्तात्रय मोरे बोलताना म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार त्यांचा त्याग, त्यांचे मातृभूमी विषयी प्रेम यांविषयी माहिती दिली, तसेच मराठी भाषा जपण्याचे व दैनंदिन जीवनात तिचा अभिमानाने वापर करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल प्रेम आणि आदर वाढीस लागला. मनिषा गव्हाणे, साक्षी हुश्शार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अॅकेडमीक कॉर्डिनेटर बाळू निळ, रुपाली शेटे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बलिदानाचे महत्त्व सांगून, मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या .मराठी विभागातील माधुरी देहाडराय, भाग्यश्री बर्डे यांनी विद्यार्थ्यांना निबंध व हस्ताक्षर लेखन स्पर्धेसाठी प्रोत्साहित केले .

# तालुक्यात ग्रामपंचायत रंगात

## * गावकी-भावकी ओळखत नाही तरीही सरपंचपद हवे! * राजकारणात नव्या चेहऱ्याची एंट्री

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकांबाबत कोणत्याही प्रकारची सूचना दिली नसताना श्रीगोंदा तालुक्यातील अनेक गावात युवकांनी सत्ता काबीज करण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. महत्वाची म्हणजे त्यांना गावकी-भावकी ओळखत नाही, पण सरपंचपद माझंच! या एका वाक्याने ग्रामपंचायत राजकारणात तापमान वाढवले आहे. स्थानिक पातळीवर अजून पाय रोवायचे बाकी असतानाच थेट सरपंचपदाची महत्त्वाकांक्षा जाहीर झाल्याने गावात कुतूहल, कुजबुज आणि खळबळ सुरू झाली आहे.

तालुक्यातील ११६ तब्बल ७० ग्रामपंचायतीची मुदत संपली असून याबाबत निवडणूक आयोगाने कोणत्याही प्रकारची सूचना काढलेली नसल्यामुळे ७० ग्रामपंचायतीवर प्रशासक नेमण्यात आले आहेत. तर या ठिकाणी निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात असे अनेकांना वाटत असल्याने गावातील जुन्या खोडांना बगल देत युवकांनी सत्ता काबीज करण्यासाठी जोरदार कंबर कसली आहे. मात्र त्यांना नीटशी गावातील गावकी-भावकी ओळखत नाही, तरी पण सरपंचपद माझंच! आहे आणि मीच उभा राहणार अशी ठाम भूमिका युवक मांडत आहेत.

ते राजकारणात नवीन येऊ पाहत असल्यामुळे सध्या आपला डंका वाजविण्यासाठी विविध माध्यमांचा वापर सुरू आहे. आज निवडणूक म्हटलं की जनता उमेदवाराचा गावातील सामाजिक संपर्क मर्यादित आहे का हे तपासतात. तसेच पारंपरिक गट-तट, नातेसंबंध आणि स्थानिक समीकरणांची अपुरी ओळख तरीही विकासाच्या अजेंड्यावर थेट दावा करणे चुकीचे आहे.

# चिंच हंगाम जोरात सुरू ; यंदा २० टक्के जादा

## कर्नाटक मधून चिंचेची आवक ; महाराष्ट्रात थोडा उशीर

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : चिंचेचा हंगाम सुरू झाला असून यंदा कर्नाटक मधील सुक्या मालाची आवक वाढली आहे. दमदार पावसामुळे यंदा गतवर्षापेक्षा २० टक्के जादा माल उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्रात चिंच ओलसर असल्यामुळे तो उशिरा निघणार आहे.

महाराष्ट्र राज्यात थंडी हटत नसल्यामुळे चिंच सध्या ओल्या स्वरूपात आहे. बिगर फोडलेल्या चिंचेला १५ रुपयांपासून ३५ रुपयांपर्यंत किलोला भाव निघाला असून गत आठवड्यात तो ४० ते ४५ रुपयांपर्यंत गेला होता.

लातूर उदगीर या पट्ट्यात गेल्या आठवड्यात झालेल्या काहीशा गारपिटीमुळे चिंचेची मागणी घटली आहे.

थंडी कमी होत नसल्यामुळे चिंच ओलसर आहे. या आठवड्यात उन्हाचा



चटका बसू लागला असून चिंचेवर त्याचा परिणाम होणार आहे. पिवळसर आणि मोठे पत्ते असलेल्या फुटलेल्या चिंचेला १२० ते १३० अशा स्वरूपात भाव मिळत आहे.

आंध्र प्रदेश, मद्रास, तेलंगणा मध्य प्रदेश, राजस्थान अशा मोठमोठ्या राज्यात चिंचेला दरवर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

चिंचेप्रमाणेच चिंचोक्याला देखील ३५ ते ४० रुपये किलो असा भाव मिळत आहे. गत वर्षापेक्षा यंदा तो कमी आहे.

यंदा चिंच जास्त असल्या कारणाने चिंचोक्याला देखील भाव कमी मिळत आहे.

गत वर्षापेक्षा यंदा चिंचेला ७० टक्के फुलोरा आला होता. दमदार पावसामुळे हा तो तसाच टिकून राहिल्याने चिंच भरपूर प्रमाणात उपलब्ध होणार आहे.

चिंचेची पौष्टिक मूल्य आणि आरोग्यासाठी मोठे फायदे आहेत. चिंचेमध्ये कॅलरीज कमी असतात आणि फायबर जास्त असते. हे शरीरातील जळजळ कमी करण्यास आणि सांधेदुखीमध्ये मदत करते चिंच रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकते आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी करते.

चिंचेचा औषधी उपयोग देखील असून पोटदुखी, बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी त्याचा उपयोग आहे. कच्च्या चिंचेचा लेप हाडांच्या दुखापतीवर किंवा सुजेवर लावल्यास गुणकारी ठरतो. असे काही जाणकार सांगत आहेत.

# द•ख•ल

## शास्त्रीनगर शाळेत हिंद दी चादर कार्यक्रमाचे आयोजन



**बालाजी देडगाव** : मानवी मुल्यांच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या गुरू तेग बहादूर यांच्या स्मृती प्रित्यर्थ राज्य सरकार तर्फे हिंद दी चादर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शास्त्रीनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शास्त्रीनगर या शाळेत,हिंद दी चादर हा श्री तेग बहादूर शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने शास्त्रीनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक सय्यद अली यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी विद्यार्थी, गांवकरी, शिक्षक यांनी प्रभातफेरी काढली. तसेच शाळेत विद्यार्थ्यांना गुरू तेग बहादूर यांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखवण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सहशिक्षिका बोरगावकर यांनी विद्यार्थ्यांना गुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाची कहानी सांगितली.

## गुरू तेगबहादुर यांचे कार्य लढण्याची प्रेरणा देते : इंगावले




**अमरापुर** : घुले शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव विद्यालयात श्री तेगबहादुर यांची ३५० वा बलीदान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले सर होते या प्रसंगी इंगावले सरांच्या हस्ते तेगबहादुर साहिब यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात रणजित जाधव यांनी तेगबहादुर साहिब यांच्या जीवन परिचय करून अभिवादन केले. अध्यक्षीय भाषणात इंगावले यांनी सांगितले, गुरू तेगबहादुर साहिब यांना समाजाने हिंद दी चादर ही उपाधी दिली आहे. याप्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे, विकास राऊत, भाऊसाहेब बर्डे, विशाल जोशी, प्रमिला बोडखे, यशोदास वाघमारे, रणजित जाधव, राजाराम लिंभोरे गोरख लिंभोरे, विद्यार्थी- पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे यांनी केले आणि आभार जाधव यांनी व्यक्त केले.

## मोहिनीराजांच्या मंदिरात पसायदान प्रतिमेचे अनावरण



**नेवासा** : मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर माऊलींनी लिहलेली पसायदान प्रतिमा ग्रामदैवत श्री मोहिनीराजांच्या मंदिरात बसविण्यात आली. या प्रतिमेचे अनावरण व व्यासपीठावर बसविण्यात आलेल्या माऊलींच्या प्रतिमेसह ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पूजन संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आले. जी मराठी भाषा ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वर माऊलींनी नेवासा भूमीतून अमृतमय केली त्याच भूमीचे ग्रामदैवत असलेल्या श्री मोहिनीराज मंदिराला संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी भेट दिली.यात्रा उत्सव काळात तयार करण्यात आलेल्या दगडी व्यासपीठावर संत ज्ञानेश्वर माऊलींची प्रतिमा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी ठेऊन एकादशी व राजभाषा मराठी दिनाचे औचित्य साधून पूजन करण्यात आले.

# बालविवाह रोखणे ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी : न्यायाधीश राऊत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव** .: बाल विवाहाचे खूप मोठे दुष्परिणाम आहेत. बाल संरक्षणाबाबत अस्तित्वात असलेल्या कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. बालविवाह लावून देणारे कुटुंब व लग्नाला उपस्थित वराडी मंडळींवर देखील कायदेशीर कारवाई केली जाते.

बालविवाह रोखणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. समाजात बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी विद्यार्थ्यांसह प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, स्वतःचे हक्काचे संरक्षण करावे, असे आवाहन कर्जत दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश रामराव राऊत यांनी केले.

राज्यात शासनाने बालविवाह कायद्याच्या जनजागृतीसाठी शंभर दिवसांचा विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याअनुषंगाने कर्जत तालुका वकील संघ आणि तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त




विद्यमाने भारत विद्यालय, मिरजगाव येथे 'बाल विवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत कायदेविषयक जनजागृती शिबिराचे शुक्रवारी, दि.२७ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक खुरांगे हे होते.

या कार्यक्रमास कर्जत वकील संघाचे अध्यक्ष ड. संग्राम ढेरे, उपाध्यक्ष ड. दत्तात्रय चव्हाण, सचिव ड. अविनाश मते, ज्येष्ठ विधीज्ञ ड. अभय खेतमाळस, ड. शफीक शेख, ड. अनिल म्हेत्रे, ड. ओंकार कुलकर्णी, ड. विठ्ठल सातव, ड्.विश्वास घालमे, ड. सलमान पठाण, न्यायालयीन कर्मचारी निकाळजे, डोळझाके यांच्यासह आदी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते.

यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना न्यायाधीश राऊत म्हणाले, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार मुलींचे किमान वय १८ वर्षे व मुलांचे २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे.

बालविवाहामध्ये केवळ पालकच नव्हे तर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणारे सर्वजण दोषी ठरतात. त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई होऊ शकते. लवकर लग्न झाल्यास मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर व करिअरवर परिणाम होतो. अपुरी शारीरिक वाढ, पोषणाचा अभाव व मानसिक तयारी नसताना संसाराची जबाबदारी टाकली जाते, त्यामुळे भवितव्य धोक्यात येते.

विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, स्वतःवर विश्वास ठेवावा, बालविवाह प्रतिबंध कायदा हा मुलींना संरक्षण देणारा कायदा आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.


यावेळी अॅड.संग्राम ढेरे म्हणाले, शिक्षण हा आयुष्याचा दागिना आहे. समाजातील प्रत्येक घटकाने बालविवाह विरोधात एकत्र येऊन लढा द्यावा. तसेच बालविवाह रोखण्यासाठी १०९८ या 'चाइल्ड हेल्पलाईन' क्रमांकाचा वापर करण्यात यावा. बालविवाह रोखण्यासाठी विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना शपथ देण्यात आली.

या शिबिराच्या माध्यमातून उपस्थित ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याची सविस्तर माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅड.खेतमाळस यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गवारे सर यांनी केले..

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शनिवार, दि.२८ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## उक्कलगाव-पटेलवाडी शिवारात बिबट्या जेरबंद

**श्रीरामपूर :** ग्रामीण भागात बिबट्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असून रोज कुठे ना कुठे बिबट्याने हल्ल्याच्या घटना समोर आल्या आहे. तालुक्यातील उक्कलगाव-पटेलवाडी शिवारात बिबट्या जेरबंद झाल्याची घटना घडली. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास पटेलवाडी शिवारातील शेतकरी नितीन फुलपगार यांच्या वस्तीवर लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात अखेर बिबट्या जेरबंद झाला. पटेलवाडी येथे शेतकरी नितीन दादू फुलपगार यांचा यांची गट नंबर १५७ मध्ये शेती आहे.येथे मागील आठवड्यातच यांच्या कालवडीचा बिबट्याने झडप घालून फडशा पडल्याची घटना घडली.यामुळे बिबट्याची दहशतीखाली परिसर होता.मात्र याबाबत सकाळी ही घटना लक्षात आल्यानंतर यांची वार्ता गावभर पसरली.बघ्यांनी मोठी गर्दी केली. त्यांनी वनविभागाला माहिती देताच श्रीरामपूर वनविभागाचे वनपाल अक्षय बडे, मदतनीस बंडू खेमनर हे घटनास्थळी दाखल झाले. त्यामुळे काही का होईना परिसरातील शेतकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.सध्या या भागात बिबट्यांची संख्या जास्त असून रोज कुठे ना कुठे बिबट्याचे हल्ले होत आहे.



**बिबट्यांसह बछड्यांचे वास्तव्य तेथे आणखी बिबट्यासह बछडे वास्तव्यास-पटेलवाडी धनवाट शिवारात आणखी बिबट्यासह बछडे वास्तव्यास सागितलं जाते. बिबट्याच्या मागे बछडे असल्याचे शेतकऱ्यांनी सागितले.**

# शिर्डी - शिंगणापूर रस्त्याची साडेसाती कधी संपणार?

## साई,शनिभक्तांचा प्रश्न; स्थानिक नागरिक, शेतकरी व विद्यार्थीही हैराण

बाळासाहेब नवगिरे । राष्ट्र सह्याद्री

**पानेगांव :** जागतिक कीर्तीचे साई देवस्थान शिर्डी व शनिदेवस्थान शिंगणापूर यांना जोडणारा बायपास रस्ता सध्या खड्ड्यात बुडाला आहे. साईभक्त, शनिभक्तांसह स्थानिक नागरिक, शाळा-कॉलेज विद्यार्थी, साखर कारखाने, दूध प्रकल्प, श्रीरामपूर एमआयडीसी व शेतकऱ्यांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कधी थांबणार ही साडेसाती? असा सवाल साई-शनिभक्त करत आहेत. तत्कालीन दिवंगत माजी आ. जयंतराव ससाणे, खा. तुकाराम गडाख व माजी खा. यशवंतराव गडाख यांच्या पाठपुराव्याने हा रस्ता मंजूर झाला होता. नगर-मनमाड मुख्य रस्त्याला पर्याय म्हणून २० किलोमीटर अंतर वाचवणारा हा ६० कि.मी. लांबीचा रस्ता शिर्डी-गणेशनगर-वाकडी-श्रीरामपूर-बेलापूर-पढेगांव-भेर्डापूर-पाथरे खु.-मांजरी-पानेगांव-करजगांव-गणेशवाडी-शनिशिंगणापूर असा चार तालुक्यांतून जातो. यामुळे वाहतूक कोंडी कमी झाली होती. मात्र आज श्रीरामपूर तालुक्यातील मालुंजा, भेर्डापूर, राहुरी तालुक्यातील पाथरे खु., मांजरी व नेवासे तालुक्यातील पानेगांवपर्यंत रस्ता पूर्णपणे खड्ड्यांनी भरला आहे. सुख-दुःखाच्या कार्यक्रमांसाठी, शासकीय कामांसाठी ये जा करणाऱ्या नागरिकांना व दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागते.

या रस्त्यावर साखर कारखाने, दूध शीतगृह, दूध प्रक्रिया प्रकल्प, शाळा-महाविद्यालये व शेतकऱ्यांचे प्रकल्प असल्याने दळणवळणाचे महत्त्व प्रचंड आहे. तरीही सार्वजनिक बांधकाम विभाग डोळेझाक करत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.



पानेगांव-शिर्डी शिंगणापूर बायपास रस्त्याची दुरवस्था (छाया - सुजित पाटील)

### लोकप्रतिनिधींनी लक्ष घालावे

शिर्डी-शिंगणापूर बायपास हा मुख्य नगर-मनमाड रस्त्याला पर्याय असून चार तालुक्यांतून जातो. शाळा, महाविद्यालये, साखर कारखाने, दूध व्यवसाय व मोठे आगर येथे असल्याने रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले व आमदार विठ्ठलराव लंघे यांनी तातडीने काम मार्गी लावावे, अशी मागणी भाऊसाहेब विटनोर, उपाध्यक्ष, मुळाथडी पाणी आरक्षण कृती समिती यांनी केली आहे.

### आंदोलनाचा इशारा

रस्त्याची तात्पुरती मलमपट्टी व अर्धवट काम याबाबत तातडीने लक्ष न दिल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर परिषद कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा रासपचे जिल्हाप्रमुख नानासाहेब व पाथरे खु. येथील सामाजिक कार्यकर्ते रणछोडदास जाधव यांनी दिला आहे. साईभक्त व शनिभक्तांसह स्थानिक नागरिक आता तातडीने रस्त्याचे काम सुरू होण्याची प्रतीक्षा करत आहेत.

# बेलापुरात घरफोडी ७५ हजाराचा ऐवज लंपास



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर खुर्दमध्ये महिला पुणे जवळील शिक्रापूर येथे मुलाकडे गेली असता अज्ञात चोरट्यांनी त्यांचे बंद घर फोडून घरातील ७५ हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बेलापूर खुर्दमध्ये येथील राधा राजेंद्र गोरे, (वय-५५) यांचा मुलगा ऋषिकेश हा शिक्रापूर येथे खाजगी नोकरीला आहे. त्या मध्ये मध्ये त्याच्याकडे जात असतात. काही दिवसांपूर्वी त्यांचा मुलगा व नातू बेलापूर खुर्द येथे घरी आले होते. दोन दिवस थांबल्यानंतर हे सर्व कुटुंब शिक्रापूर येथे गेले. जाताना घराला कुलूप लावले होते. दरम्यान, त्यांच्या शेजारी राहणाऱ्यांचा फोन आला की, तुमच्या घराचा दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला आहे, दार लोटलेले दिसते. असे सांगितल्याने राधा गोरे व त्यांचा मुलगा तातडीने बेलापूर खुर्द येथील घरी आले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. घरातील ३० हजारांची रोकड, ४० हजारांच्या सोन्याच्या दोन पोत व ५ हजार रूपयांची अंगठी कोणीतरी अज्ञात चोरट्याने घर फोडून चोरून नेले.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसात राधा राजेंद्र गोरे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मानवी हस्तक्षेपाशिवाय 'ऑनलाईन' पध्दतीने

# थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित!

रवींद्र बालोटे । राष्ट्र सह्याद्री




**आश्वी :** महावितरणने आपल्या कार्यप्रणालीमध्ये अत्याधुनिक बदल केले असून, आता वीज बिल थकविणाऱ्या ग्राहकांबाबत कठोर धोरण अवलंबले आहे. संगमनेर तालुक्यातील आश्वी परिसरातील गावांमध्ये कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय 'ऑनलाईन' पध्दतीने वीज पुरवठा खंडित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

महावितरणने वीज चोरीला आळा घालण्यासाठी स्मार्ट मीटर बसवण्यात येत असल्याचे कारण पुढे करत बहुतांश ठिकाणी नवीन मीटर बसवले आहे. त्यानंतर आता आश्वी बुद्रुक, आश्वी खुर्द यांसह परिसरातील गावांमधील बहुतांश ग्राहकांचे जुने मीटर काढून त्या ठिकाणी नवीन 'स्मार्ट मीटर' बसवून ते अद्ययावत सॉफ्टवेअर आणि मध्यवर्ती प्रणालीशी जोडले आहेत.

त्यामुळे बिल न भरणाऱ्या ग्राहकांची यादी आता आपोआप तयार होत असून, वीज देयक प्राप्त झाल्यापासून सलग ४५ दिवस भरणा न केल्यास सिस्टीमद्वारे सिग्नल पाठवून वीज पुरवठा आपोआप खंडित करण्यास सुरुवात झाली आहे.

या नवीन स्वयंचलित यंत्रणेमुळे आता वीज कापण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला प्रत्यक्ष जागेवर जाण्याची गरज उरलेली नाही, सर्व प्रक्रिया डिजिटल पध्दतीने पूर्ण केली जात आहे. या प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप नसल्यामुळे वशिलेबाजीला पूर्णपणे चाप बसणार असून ग्राहकांचे काम देखील जलद गतीने होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, ज्या ग्राहकांची वीज अशा प्रकारे ऑनलाईन पद्धतीने खंडित झाली असेल, त्यांनी घाबरून न जाता तातडीने ऑनलाईन थकीत बिलाचा भरणा करावा. ग्राहकाने ऑनलाईन बिल भरल्याची नोंद सिस्टीममध्ये होताच, अवघ्या १० ते १५ मिनिटांच्या कालावधीत वीज पुरवठा आपोआप पूर्ववत होईल, अशी माहिती आश्वी खुर्द येथील वीज वितरण यंत्रणेकडून देण्यात आली आहे.

### स्मार्ट मीटर - सुविधा की नवी डोकेदुखी?

महावितरणची ही नवीन 'स्मार्ट मीटर' प्रणाली वादाच्या भोवऱ्यात अडकण्याची शक्यता असून ग्राहकांमध्ये देखील मोठा संभ्रम आहे. विशेषतः डिजिटल साक्षरता नसलेले ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील ग्राहकांना या प्रक्रियेत अडचणी येऊ शकतात. तांत्रिक बाजूचा विचार करता, दुर्गम भागातील 'नेटवर्क कनेक्टिव्हिटी'चा अभाव आणि महावितरणच्या सर्व्हरची मर्यादित क्षमता यामुळे '१० मिनिटांत वीजपुरवठा' होण्याचा दावा फोल ठरू शकतो. सॉफ्टवेअरमधील त्रुटींमुळे बिल भरूनही वीज कापली जाण्याचे प्रकार शहरी भागात उघडकीस येत आहेत. त्यामुळे ही प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित करण्यापूर्वी सर्व्हरची क्षमता वाढवणे आणि तांत्रिक दोषांचे निवारण करणे महावितरणसाठी अनिवार्य ठरणार आहे. त्यामुळे ही स्मार्ट प्रणाली ग्राहकांसाठी फायदेशीर ठरते की डोकेदुखी हे येणारा काळच ठरवेल.

# गलांडे प्रकरणात फेगडे यांच्यावर विभागीय कारवाईचे आदेश

## जमीन नोंद फसवणूक प्रकरणाला वेग

**शिरसगाव :** उंदीरगाव येथील नानासाहेब गलांडे यांच्या जमीन नोंद प्रकरणात वादग्रस्त फेरफार प्रकरणी संबंधित महसूल अधिकाऱ्यावर विभागीय कारवाई करण्याचे आदेश अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिले आहेत.

गट क्रमांक ७९ संदर्भातील वादग्रस्त फेरफार कायदेशीरदृष्ट्या अमान्य ठरवत उपसंचालक, भूमी अभिलेख नाशिक यांनी तो रद्द केला होता. न्यायालयानेही मूळ नोंदी कायम ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, फसवणूक व बनावट कागदपत्रांच्या आरोपांप्रकरणी प्रवीणकुमार उत्तमचंद छल्लाणी व राजेंद्रकुमार दुधेंडिया यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६८, ४७१ सह ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेश श्रीरामपूर येथील प्रथम श्रेणी न्यायाधीश जितेंद्र जाधव यांनी २५ फेब्रुवारी रोजी दिले. मात्र, उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्याविरुद्धची तक्रार फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १९७ अंतर्गत आवश्यक शासकीय मंजुरीअभावी नामंजूर करण्यात आली होती. त्यानंतर पंकज सुधाकर फेगडे, तत्कालीन उपअधीक्षक भूमी अभिलेख श्रीरामपूर, यांनी नोंदवलेले फेरफार क्रमांक ११० व १११ (दि. ८ जुलै २०१९) हे सदोष असल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले. न.भू. क्र. ८९७ ते ९०० या मिळकत पत्रिकेवरील नोंदी प्रक्रियाविरुद्ध केल्याचे निदर्शनास आले आहे.

# तीन दरोडेखोरांना पाठलाग करून पकडले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**राहुरी :** कल्याण येथील कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील पडलेल्या दरोड्यातील तीन आरोपींना राहुरी पोलीस स्टेशनच्या पोलीस पथकातील अंमलदारांनी रात्रीच्या वेळेस पाठलाग करून शिताफिने ताब्यात घेतले आहे.

या घटनेची हकीगत अशी की, गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस पथकातील पोलीस हवालदार शकूर सय्यद, पो.ना. प्रविण अहिरे, पो.कॉ. नदीम शेख, पो.कॉ. प्रमोद ढाकणे, पो.कॉ. सचिन ताजने असे रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास राहुरी शहरात सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करत असताना राहुरी पोलीस स्टेशनचे प्रमोद ढाकणे यांना कल्याण येथील कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे हेडकॉन्स्टेबल विशाल वाघ यांचा फोन आला. त्यावर खबर मिळाली की, कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर १०३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४)(६),२०४ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपी उमाशंकर हनुमान प्रसाद पांडे उर्फ पप्पू व ५१ वर्ष रा. सेट जोसेफ स्कूलच्या पाठीमागे उल्हासनगर, शरद कुमार मोहन व ४६ वर्ष राहणार पिंटू पार्क रोड उल्हासनगर नरेश फत्तु शर्मा वय ४५ वर्ष राहणार आशीर्वाद सोसायटी सेक्शन तीन गुलजार रोड उल्हासनगर असे स्कार्पिओ गाडी नंबर एम एच ०५ ए.जे.०२४७ ही गाडी घेऊन सदर दरोडयाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी आहेत व ते सध्या नगर वरून शिर्डीकडे जात आहेत, त्यांना ताब्यात घ्या. सदर माहिती मिळतात राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे यांना तात्काळ कळविली असता त्यांनी वरील अंमलदार यांना ताबडतोब नाकाबंदी करण्याच्या सूचना देऊन वरील गाडी व त्या गाडीतील आरोपी यांना ताब्यात घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार राहुरी पोलीस स्टेशनचे अंमलदार यांनी राहुरी कॉलेज जवळ नगर शिर्डी हायवेवर नाकाबंदी केली असता सदरील वाहन व गाडीतील इसम ह्यांना हात दाखवून थांबविण्याचा इशारा केला.

# मुळा उजवा कालवा फोडला; अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

✻ पैठण तालुक्यातील दरोडेखोरांना अहिल्यानगरमध्ये अटक
✻ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : तीन गुन्ह्यांची उकल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पैठण तालुक्यातील कौंडगाव तांडा येथील दोन आरोपींना अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून, त्यांच्याकडून तीन दरोड्याचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री २ वाजता नारायणडोह येथील प्रतिभा पंढरीनाथ साठे यांच्या घरावर पाच आरोपींनी चाकूने वार करून दरोडा टाकला. घराचा दरवाजा तोडून काठीने मारहाण करत २ लाख १७ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने लुटले. नगर तालुका पोलिस ठाण्यात गु.र.नं.११२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ३११ अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता.

पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने २५ फेब्रुवारीला चांदबिबी महाल परिसरात सापळा रचला. फोर्ड फिस्टा कार (एमएच ०३ बीएच ९००२) अडवून सोमीनाथ उर्फ पिप्या मिनाजी काळे (३०) व चिंग्या उर्फ सौरभ सचिन काळे (२१, दोन्ही रा. कौंडगाव तांडा, पैठण) यांना ताब्यात घेतले. आरोपींनी चौकशीत कबुली दिली की, चिक्या गोप्या चव्हाण, तुषार नंदू भोसले, आसिफ निमाजी काळे व भगवान इंपीरियल चव्हाण (सर्व फरार) यांच्यासोबत त्यांनी हा व आणखी दोन दरोडे केले. भिंगार कॅम्प गु.र.नं.६६/२०२६ व नगर तालुका गु.र.नं.११३/२०२६ असे एकूण तीन गुन्हे उघड झाले. आरोपींकडून ३ लाखांची कार व १२ हजारांचे दोन मोबाईल जप्त करण्यात आले. पुढील तपास नगर तालुका पोलिस करत आहेत.




### माहिती देणारास ५ हजाराचे बक्षीस

मुळा उजवा कालव्याचा ड्रेन-पाईप फोडतांना अज्ञात इसमास कोणी पाहिले असल्यास किंवा फोडणाराची नावे माहित असल्यास पाटबंधारे विभागाशी संपर्क साधावा. असे कृत्य करणाराचे नाव सांगणाऱ्यास ५ हजार रूपयांचे बक्षीस देण्यात येईल. तसेच माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

**- स्वप्निल देशमुख**
**(चिलेखनवाडी उपविभाग उपाभियंता)**

### पाटबंधारे विभागाचे आवाहन

कालवा, बंधारा किंवा इतर जलसंपदा संरचनेबाबत कोणतीही संशयास्पद हालचाल, नुकसान किंवा छेडछाड आढळल्यास त्वरित संबंधित विभागाला कळवावे. सार्वजनिक जलसंपत्तीचे संरक्षण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पाटबंधारे विभागाने दिला आहे.

# पाणीपट्टी भरा अन्यथा पाणीचोरीचा गुन्हा दाखल होणार!

## हद्दीबाहेरील नागरिकांनी ३१ मार्चपर्यंत थकबाकी भरण्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपुरात ज्या नागरिकांकडे अनधिकृत नळ कनेक्शन असतील त्यांनी ३१ मार्चच्या आत ५ हजार रुपये भरून नळ कनेक्शन अधिकृत करून घ्यावे. अन्यथा ३१ मार्चनंतर ज्या नागरिकांकडे अनधिकृत नळ कनेक्शन आढळतील त्यांच्यावर २५ हजार रुपये दंड आकारून पाणीचोरीचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी दिला आहे.

शहरात १७ हजार ३९० नळजोड असून लोकसंख्या एक लाख पाच हजारांहून अधिक आहे. शहराला दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने वर्षाकाठी नागरिक केवळ अर्धा काळ पाणी घेतात. साठवण तलावात जनावरे, डुकरे शिरतात, इतकेच नव्हे, तर आत्महत्येसारख्या घटनाही घडल्या आहेत. अस्वच्छ पाणीपुरवठा असताना दरवाढ कशासाठी, असा सवाल बिहाणी यांनी उपस्थित केला. त्यानंतर मुख्याधिकारी घोलप यांनी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देऊन शहराबाहेरील कनेक्शन बंद करण्याबाबत किंवा कठोर वसुली करण्याबाबत पावले उचलणार असल्याचे सांगितले.

यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन नागरिकांना सूचित करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी थकबाकी भरून पालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष ससाणे व मुख्याधिकारी घोलप यांनी केले आहे.

### शहराबाहेर १ कोटी ६१ लाखांची थकबाकी

श्रीरामपूर शहरालगतच्या बेलापूर, शिरसगाव व भैरवनाथनगर ग्रामपंचायत या हद्दीतील गायकवाड वस्ती, रामकृष्णनगर, इंदिरानगर व गोंधवणी परिसरातील नळधारकांकडे १ कोटी ६१ लाखांची थकबाकी आहे. त्यांना थकबाकी भरण्यासाठी १० मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे. जर १० मार्चपर्यंत हद्दीबाहेतील नागरिकांनी आपली थकबाकी भरली नाही, तसेच ८० टक्के वसुली झाली नाही तर येथील पाणीपुरवठा कायमचा खंडित केला जाईल.

**- करण ससाणे, नगराध्यक्ष**